१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• पुणे, सोमवार ४ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२२४, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 224 Marathi - Daily - Pune, 4 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
navakal.in
पुणे पुन्हा एकदा हादरलं!
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# ५ राज्यांतील निवडणुकीचा आज निकाल!
## ममता, स्टॅलिन गढ राखणार? राजकीय हालचालींना वेग

■ कोलकाता



**पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. एप्रिल महिन्यात पार पडलेल्या या निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. या राज्यांतील अनुक्रमे तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकची सत्ता उलथवण्यासाठी भाजपाने कंबर कसली आहे. या राज्यात भाजपा विजयी झाल्यास विरोधकांचे देशातील शेवटचे गडही काबीज होतील. या निकालांचा परिणाम देश पातळीवर होणार असल्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या मतमोजणीकडे लागले आहे.**

**महाराष्ट्रात** बारामती आणि राहुरी या मतदारसंघात पोटनिवडणूक होत असून, बारामतीत दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार रिंगणात आहेत. पश्चिम बंगालमध्ये यावेळी चुरशीची निवडणूक होईल, असे मानले जात आहे. भाजपाने ममता बॅनर्जीच्या तृणमूल काँग्रेससमोर तगडे आव्हान उभे केले आहे. २०२१ मध्ये तृणमूलने २९४ पैकी २१५ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाने ७७ जागांवर झेंडा फडकावला होता. यावेळी काही एक्झिट पोलनी भाजपाला बहुमत मिळेल, असा अंदाज वर्तवला आहे. बंगालमध्ये यंदा दोन टप्प्यांत विक्रमी ९२ टक्के मतदान झाले आहे. जनगणनेचा निकालावर परिणाम होतो का याची उत्सुकता आहे. तामिळनाडूत मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्ष सत्ता राखण्याचा प्रयत्न करत आहे. स्टॅलिन यांनी आज त्यांच्या पक्षाच्या सर्व उमेदवारांची बैठक घेतली. फोडाफोडी होऊ नये यासाठी दक्षता घेतली जात असल्याचे म्हटले जात आहे. २०२१ मध्ये २३४ पैकी १३३ जागा मिळवून द्रमुक सत्तेत आला होता, तर प्रमुख विरोधी पक्ष अण्णा द्रमुकला ६६ जागा मिळाल्या होत्या. भाजपाची अण्णा द्रमुकबरोबर युती आहे. यंदा अभिनेता विजय यांनी आपल्या तमिळगा वेट्री कळघम पक्षाला निवडणुकीत उतरवून लढत तिरंगी केली आहे. केरळमध्ये सध्या डाव्या आघाडीचे (एलडीएफ) सरकार असून, गेल्या वेळी तिने १४४ पैकी ९९ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते. यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ बाजी मारेल असा अंदाज आहे. आसाममध्ये हिमंता बिस्वा

पान २ वर

### बारामतीत सुनेत्रा पवार राहुरीत कार्डिलेंचा विजय निश्चित

महाराष्ट्रात अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर होणाऱ्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार रिंगणात असून, मुख्य पक्षांनी या निवडणुकीतून माघार घेतली असल्याने त्या किती मतांनी निवडून येणार एवढाच प्रश्न आहे. भाजपा आमदार शिवाजी कार्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या राहुरीच्या जागेवर त्यांचे पुत्र अक्षय कार्डिले यांना भाजपाने उमेदवारी दिली आहे. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे तसेच वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके निवडणूक लढवत आहेत. या लढतीत अक्षय कार्डिले यांचे पारडे जड आहे.

## थोडक्यात...

### १२ वीत नापास झालेल्या विद्यार्थ्याची आत्महत्या

**भंडारा -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल काल जाहीर झाला. निकालानंतर परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याच्या धक्क्यातून भंडारा जिल्ह्यातील १८ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केली. भंडाऱ्यातील रोंघा येथील या विद्यार्थ्याने बारावीची परीक्षा दिली होती. निकाल जाहीर झाल्यानंतर आपण नापास झाल्याचे समजताच तो मानसिक तणावात होता. याच नैराश्यातून दुपारी त्याने गावाजवळील शेतात गळफास घेऊन आपले जीवन संपवले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### बारावी निकालानंतर दुसऱ्याच दिवशी नीट! निर्णयावर संताप

**मुंबई -** बारावीच्या निकालाच्या वेळापत्रकावरून राज्य सरकार आणि शिक्षण मंडळावर टीका करणारा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये महाराष्ट्र बोर्ड आणि शिक्षण मंत्र्यांवर तीव्र शब्दांत टीका करत बारावी निकाल नीट परीक्षेच्या तारखेच्या आदल्या दिवशी ठेवल्याबद्दल सरकारला जाब विचारला गेला.



व्हिडिओमध्ये असे म्हटले आहे की, 'नीट'सारखी राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची परीक्षा ३ मे रोजी होणार असल्याची माहिती आधीपासूनच होती. तरीही महाराष्ट्र बोर्डाने २ मे रोजी बारावीचा निकाल जाहीर केल्यामुळे विद्यार्थ्यांवर अनावश्यक मानसिक ताण येत आहे. देशभरातील लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसणार असताना महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या नियोजनाचा विचार न करता त्यांचे नुकसान कसे करता येईल, हे शिक्षणमंत्र्यांनी आम्हाला दाखवून दिले. देशात काय चालले आहे? मुलांच्या आयुष्यात काय चालले आहे? आमच्या मराठी मुलांना फक्त झेंडे घेऊन तुमच्या मागे पळवायचे आहे.

## माझ्या मुलीला न्याय मिळेपर्यंत राजकारण्यांनी भेटायला येऊ नये
### पीडितेच्या वडिलांची भूमिका

**पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावात एका ४ वर्षांच्या चिमुरडीची १ मे रोजी ६५ वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केली. या घटनेनंतर मुलीचे नातलग आणि नसरापूरचे ग्रामस्थ आक्रमक झाले. त्यांनी माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेच्या निषेधार्थ गावात ३ दिवस कडकडीत बंद पुकारला आहे. पीडित मुलीच्या वडिलांनी आज व्हिडिओ पोस्ट करून माझ्या मुलीला न्याय मिळेपर्यंत राजकारण्यांनी भेटायला येऊ नये, अशी स्पष्ट भूमिका मांडली.**

■ पुणे

**पीडित** मुलीच्या वडिलांनी म्हटले की, मी मुलीच्या अस्थि विसर्जनसाठी जात असताना कुटुंब आणि मित्रांनी फोन करून सांगितले की, बरेच राजकीय नेते सांत्वन भेटीसाठी येत आहेत. माझी आणि माझ्या कुटुंबाची एकच इच्छा आहे की, जोपर्यंत माझ्या मुलीला न्याय मिळत नाही, त्या नराधमाला फाशी होत नाही तोपर्यंत एकाही राजकीय नेत्याने माझ्या घरी माझे सांत्वन करण्यासाठी आणि भेटण्यास येऊ नये, अशी माझी नम्र विनंती आहे. जेव्हा आरोपीला फाशी होईल तेव्हाच राजकारणी किंवा ज्यांना आम्हाला भेटायचे आहे, त्यांना आम्ही भेटू.

तर काल न्यायालयाने आरोपीला ७ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. मात्र या सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी आरोपीला काही तक्रार आहे का? अशी विचारणा केली. त्यावर आरोपीने उत्तर देत म्हटले की, किरकोळ भांडणातून मला या प्रकरणात विनाकारण गोवण्यात

पान ७ वर

### आरोपी यापूर्वी तपास त्रुटींमुळे निर्दोष

वकील राम सूर्यवंशी यांनी सांगितले की, आरोपीवर यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. राजगड पोलीस ठाण्यात २०१५ मध्ये आरोपीवर 'पोक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. मात्र त्या प्रकरणातील ऑर्डरमध्ये संबंधित पीडित मुलीचे वय स्पष्ट करणाऱ्या पुराव्याची तपास अधिकाऱ्याने केवळ फोटोकॉपी लावली होती. त्याची खरी प्रत न मिळाल्याने पीडितेचे खरे वय सिद्ध होऊ शकले नाही आणि आरोपी सुटण्यास मदत झाली. ही न्यायव्यवस्थेसाठी शोकांतिका आहे की, त्या गुन्ह्यातून निर्दोष सुटल्याने नसरापूर प्रकरण घडले.

## मीच का? तुम्हाला स्वत:चा आवाज नाही?
### महाजनांना प्रश्न विचारणाऱ्या टीना यांची भूमिका

■ मुंबई

**वरळी** येथे महिला आरक्षणाच्या मुद्यावर भाजपाने काढलेल्या मोर्चादरम्यान वाहतूक कोंडीवर संताप व्यक्त करत मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारणारी महिला अखेर समोर आली आहे. तिचे नाव टिना चौधरी आहे. तिने आज स्वतःचा व्हिडिओ जारी करीत तिची बाजू मांडली आहे.

व्हायरल व्हिडिओमुळे चर्चेत आलेल्या टीना चौधरी यांनी व्हिडिओद्वारे त्या दिवशी नेमके काय घडले, याची माहिती देताना सर्वच राजकीय पक्षांवर टीका केली. तर नागरिकांना मीच का तुमचा आवाज व्हावे? तुम्हाला स्वतःचा आवाज नाही का? असा सवाल केला.

टीना चौधरी म्हणाल्या की,



तुम्ही काही दिवसांपूर्वी काळी टोपी घातलेल्या एका महिलेचा व्हिडिओ पाहिला असेल. महिला मोर्चात ती वाहतूक कोंडीबाबत जाब विचारत होती. ती महिला मीच आहे. माझे नाव टीना चौधरी असून, काही गोष्टींचे स्पष्टीकरण देण्यासाठी मी हा व्हिडिओ करत आहे. त्या घटनेनंतर माझ्याविषयी काळजी व्यक्त करणारे अनेक संदेश मला आले. मी सर्वांना सांगू इच्छिते की, मी ठीक आहे. तुम्ही जी काळजी व्यक्त केली त्याबद्दल सर्वांची आभारी आहे. त्या दिवशी मी माझ्या मुलीला ४ वाजता संगीत वर्गासाठी सोडले. तिला परत आणण्यासाठी मी ४.४५ वाजता घरातून निघाले. पण मोर्चामुळे मी वाहतूक कोंडीत अडकले. जवळपास

पान ७ वर

## राज्याच्या तिजोरीला गळती
### ३२ हजार कोटींचा महसूल थकीत

■ मुंबई

**भारताचे** नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या अहवालात महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेवर गंभीर ताशेरे

#### 'कॅग'चा अहवाल

ओढण्यात आले आहेत. तब्बल ३२,३०७ कोटी रुपयांचा महसूल अद्याप वसूल न झाल्याचे उघड झाले आहे. मार्च २०२३ पर्यंतच्या कालावधीचा हा अहवाल राज्याच्या महसूल यंत्रणेसाठी धोक्याची घंटा मानला जात आहे.

'कॅग' अहवालानुसार विविध विभागांकडे थकलेली रक्कम प्रचंड आहे. १०,३५२ कोटी रुपये देणे पाच वर्षांहून अधिक काळापासून प्रलंबित आहेत. जीएसटी, विक्रीकर आणि मुद्रांक शुल्काचा मोठा हिस्सा असून सुमारे २१,९५४ कोटी रुपये न्यायालयीन आणि अपिलात अडकले आहेत. या प्रकरणांमध्ये सरकारी यंत्रणा आणि कायदेशीर लढाईतील कमकुवतपणा अधोरेखित झाला आहे. परिवहन विभागातील स्थिती चिंताजनक असल्याचे 'कॅग'ने नमूद केले. हजारो वाहनांचा

पान ७ वर

## बीडमधील केज येथे ३ वर्षांच्या नातीवर आजोबाचा अत्याचार! नराधमाला अटक

■ बीड

**पुण्यातील** भोर तालुक्यात ४ वर्षांच्या चिमुरडीवर ६५ वर्षांच्या इसमाने अत्याचार करून ठार मारल्याची घटना ताजी असताना आणखी एक भयंकर प्रकरण बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात उघडकीस आले आहे. ३ वर्षांच्या निरागस नातीवर आजोबानेच पाशवी अत्याचार केल्याच्या संतापजनक घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या प्रकरणी युसूफवडगाव पोलिसांनी तातडीने पावले उचलत ५० वर्षीय नराधम आजोबाला बेड्या ठोकल्या आहेत.

केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली असून, पीडित चिमुकलीची आई काही दिवसांपूर्वी आपल्या ३ वर्षीय मुलीला घेऊन माहेरी आली होती. मात्र, तिथे या चिमुकलीवर तिच्याच आजोबाची वाईट नजर पडली. १६ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत ५० वर्षांच्या

पान ७ वर

### चाकणमध्ये ११ वर्षीय मुलीचा विनयभंग! नराधमाला बेड्या

पुणे जिल्ह्यातील नसरापूर आणि म्हाळुंगे येथील लैंगिक अत्याचार आणि हत्येच्या धक्कादायक घटनेनंतर जिल्ह्यात तिसरी घटना बिरदवडी येथे घडली. या घटनेत ११ वर्षीय मुलीचा विनयभंग करण्यात आला असून, या प्रकरणी चाकण पोलिसांनी ३२ वर्षीय परप्रांतीय आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. काल दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास ११ वर्षीय मुलगी घरात कोणी नसल्याने घराला कुलूप लावून आपल्या काकाच्या घरी जात होती. यावेळी मुलगी एकटी

पान ७ वर

## विद्यार्थी शिकणार मोदींची नेतृत्वशैली
### महाराजा सयाजीराव विद्यापीठाचा नवा प्रयोग

■ बडोदा

**गुजरातमधील** महाराजा सयाजीराव विद्यापीठ येथे आता विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वशैलीचा शास्त्रीय अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठाने आपल्या समाजशास्त्र पदव्युत्तर (एमए) अभ्यासक्रमात सोशॉलॉजी ऑफ पॅट्रियॉटिझम (देशभक्तीचे समाजशास्त्र) हा नवा विषय सुरू केला असून, त्यामध्ये मोदींच्या 'करिष्माई नेतृत्वा'सह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

मोदी आणि संघ यांच्या समाजावरील प्रभावाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणे हा या अभ्यासक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले. समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. वीरेंद्र सिंह यांनी सांगितले की, मोदींच्या नेतृत्वाचा अभ्यास जर्मनीतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांच्या करिष्माई नेतृत्वाच्या सिद्धांताच्या आधारे केला जाणार आहे. महात्मा गांधी आणि मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांच्याप्रमाणेच मोदी यांच्या नेतृत्वातील वैशिष्ट्यांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होईल.

## अदानी, अंबानींचा अणुक्षेत्रावर कब्जा
### अमेरिकेशी भागिदारी! शिष्टमंडळ भारतात

■ नवी दिल्ली

**भारताने** २०२५ मध्ये अणुउर्जेशी संबंधित ऐतिहासिक 'शांती' कायदा केल्यानंतर या क्षेत्रातील सरकारी मक्तेदारी संपुष्टात आली आहे. यानंतर अणुऊर्जा क्षेत्रातील भारतात भागीदारीच्या संधी शोधण्यासाठी अमेरिकेचे उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ १७ ते २१ मे दरम्यान भारत भेटीवर येत आहे. अणुऊर्जा क्षेत्रात अमेरिकन कंपन्यांबरोबर रिलायन्स आणि अदानी यांचा करार होणार असून, हे उद्योजक आता अणुक्षेत्रही मुठीत घेण्याच्या तयारीत आहेत.



इतरही बड्या कंपन्यांना काही प्रमाणात समाविष्ट केले जाईल. वॉशिंग्टनस्थित 'न्यूक्लियर एनर्जी इन्स्टिट्यूट' आणि 'यूएस इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरम' यांच्या संयुक्त विद्यमाने या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १७ ते २१ मे दरम्यान चालणाऱ्या या पाच दिवसांच्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

दौऱ्यात हे शिष्टमंडळ परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल तसेच आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याची शक्यता आहे.

## धरण दुर्घटनेत मायलेकाचा मृत्यू
### व्हायरल व्हिडिओ-फोटो एआय निर्मित

■ जबलपूर

**मध्य प्रदेशातील** बर्गी धरणात झालेल्या भीषण क्रूझ दुर्घटनेशी संबंधित एक व्हिडिओ आणि फोटो सोशल



मीडियावर व्हायरल होत आहे. या दुर्घटनेत मृत झालेल्या मायलेकाचा हा फोटो-व्हिडिओ असून त्यात महिला लहानग्याला कवटाळून असलेल्या अवस्थेत दिसते. हे फोटो-व्हिडिओ पाहून अनेकांनी हळहळ व्यक्त केली. मात्र, या दुर्घटनेत मायलेकाचा मृत्यू झाला असला तरी फोटो आणि व्हिडिओ खोटे असल्याचे आणि ते एआय वापरून तयार करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे.

या फोटोची तपासणी केली असता त्यात काही विसंगती आढळल्या आहेत. महिला आणि मुलाचे हात, भुवया नैसर्गिकरित्या न जुळणे यांसारख्या एआय-निर्मित प्रतिमांमध्ये आढळणाऱ्या सामान्य चुका यातही असल्याचे निदर्शनास आले. या घटनेशी संबंधित खरी माहिती

पान ७ वर

## अंध-बहिरी असूनही सारा मोईनला
## आयएससी परीक्षेत ९८.७ टक्के गुण

**लखनौच्या नजरबाग येथील २० वर्षीय सारा मोईन हिने आयएससी इयत्ता १२वी परीक्षा २०२६ मध्ये ९८.७ टक्के गुण मिळवत ख्राईस्ट चर्च कॉलेजमध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. तिच्या या यशाने जिद्द, धैर्य आणि चिकाटीचे प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. लहान वयातच दृष्टी, ऐकण्याची आणि बोलण्याची क्षमता गमावूनही साराने हे यश संपादन केल्याने तिचे कौतुक होत आहे.**



■ लखनौ

**तिचे** वडील मोईन अहमद यांनी म्हटले आहे की, वैद्यकीयदृष्ट्या सारा शंभर टक्के अंध आणि बहिरी आहे. ती संवाद साधते, पण तिची भाषा इतरांना सहज समजत नाही. फक्त मी आणि तिची आईच तिचे बोलणे समजू शकतो. सारा जन्मतः पूर्णपणे निरोगी होती. मात्र, वयाच्या चौथ्या वर्षी तिच्या मानेवर गाठ आली. तिच्या उपचारासाठी आम्ही अनेक रुग्णालयांत गेलो. गाठीवर उपचार करण्यासाठी तिला स्टेरॉइडचे जास्त डोस देण्यात आले. उपचार संपल्यानंतर तिला दृष्टी, ऐकण्याची आणि बोलण्याची समस्या सुरू झाली. मुलीच्या संगोपनासाठी मी बीएसएनएलमधून स्वेच्छानिवृत्ती घेतली. तिची आई जुली अहमद या खासगी शाळेत शिक्षिका आहेत. प्रकृती अधिक बिघडत गेल्याने साराची

पान ७ वर

## भोंदू खरातच्या कोठडीसाठी ईडीची न्यायालयात धाव

■ नाशिक

**महिलांवर** लैंगिक अत्याचार आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपांमुळे अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. सक्तवसुली संचालनालय (ईडी) ने खरातचा ताबा मिळवण्यासाठी मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयात धाव घेत 'प्रॉडक्शन वॉरंट'साठी अर्ज दाखल केला आहे.

ईडीने ६ एप्रिल रोजी खरातविरुद्ध मनी लाँड्रिंगचा गुन्हा नोंदवला होता. यापूर्वी खरातच्या कार्यालयासह विविध ठिकाणी छापेमारी करून अनेक महत्त्वाचे पुरावे गोळा केले होते. आता मनी लाँड्रिंगच्या तपासाला गती देण्यासाठी त्याची सखोल चौकशी करण्याची गरज असल्याचे ईडीने न्यायालयात नमूद केले आहे. खरातला आधीच लैंगिक छळाच्या गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आली आहे. सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. मात्र, पैशांच्या अफरातफरीच्या तपासासाठी त्याला ताब्यात घेणे आवश्यक असल्याचे ईडीचे म्हणणे आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती
संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

अनुभवी इलेक्ट्रीशियन आणि हेल्पर पाहिजेत. पगार योग्यतेनुसार. संपर्क- **9819776666.** {NC260382}

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम/ पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा- दुपारी 11 ते 9 स्पिडलिंक कुरीयर शॉप नं 3 आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉसरोड अंधेरी पूर्व{NC260261}

बँकेच्या कलेक्शनसाठी मुले मुली पाहिजेत, (टेली कॉलर) Fresher / experience बारावी उत्तीर्ण DRA प्रमाणपत्र - प्रथम प्राधान्य. Salary + Incentive. सिद्धीमनोरा बिल्डिंग, ऑफिस - ३०६, नियर उडपी हॉटेल, कमल मेडिकलच्या वरती, विरार वेस्ट. सुनील- **7757963256**. {NC260313}

अलिबागयेथील रिसॉर्टकरिता 1) इलेक्ट्रिशियन पाहिजेत 2) गार्डनसाठी अनुभवी माळी पाहिजे. भेटा (12 ते 2 पर्यंत)- नार्वेकर कंपनी, अजंता अपार्टमेंट, कुलाबा बस स्टेशन/ ससून डॉक शेजारी, कुलाबा, मुंबई. {NC260396}

हाऊसकीपींग स्टाफ व महिला, पगार ग्रॉस- 15,473/-, वार्षिक बोनस, PF, ESIC लागू. संपर्क- CISB Services- **9867949433/ 8779462234.** {NC260395}

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वार्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC260340}

परेल येथे ऑफीससाठी फ्रेशर्स ऑफीस असिस्टंट आणि मार्केटिंगसाठी पाहिजेत. **9920053121** {NC260362}

बॅंक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35500/- **9021058575** {NC260362}

## पाहिजेत

**कस्टम डिपार्टमेन्टसाठी हाऊसकिपींग सुपरवायझर, मुले पाहिजेत. पगार** २२०००/-. **7208551929 / 9702126571** {NC260380}

प्रतिष्ठित कंपनीला आऊटडोअर कामासाठी प्रत्येक झोनवाईज 60 फिल्ड एक्झिक्युटिव्ह पाहिजेत. अनुभवींना आणि बाईकर्सना प्राधान्य. पगार 30,000/-+5,000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस, बायोडाटा व्हॉट्सअप पाठवा आणि कॉल करा. प्रिंस कुरीअर **9820385767/ 9029013014** {NC260345}

सुप्रसिध्द ऑफसेट प्रिंटिंग प्रेसमध्ये त्वरीत पाहिजेत 4 कलर कोमोरी 28x40 (ऑटो प्लेट): प्रिंटर, फीडरमॅन, बॉयलर, सायपा कटिंग मशीन ऑपरेटर, ६ क्लॅम्प परफेक्ट बाइंडिंग ऑपरेटर
सुविधा- Tea, Snacks, OT: 1.5 Times ESIC, PF, BONUS, TRAVELLING
पत्ता: ई-११, प्लॉट नं. २३ ते २६, भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्क, नाशिक हायवे रोड जवळ, भिवंडी
9769706594

ऑफिस कामासाठी मुले पाहिजे. आर्यन इन्फोकॉम शॉप नं.५ सहयोग बिल्डिंग एल. जे. रोड सिटीलाईट सिनेमा शेजारी माटुंगा पश्चिम. संपर्कः- **8291255645** {NC260405}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी "बायका/ मुली" पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशियन पाहिजेत. चांगला पगार + आकर्षक सुविधा. संपर्कः- **9820683431** {NC260407}

## पाहिजेत

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरित मुले पाहिजेत. फोर्ट, दादर, लोअर परेल, वडाळा, नवी मुंबई, दररोज रोख 800/- + प्रवास खर्च - कॅशमध्ये मिळेल. Speedman Express 191-B, 9th Cavel Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School. Chirabazar, Mumbai-400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC260011}

## Situation Vacant

Required office assistant at kandivali call **9869423657** {NC260386}

SDA PRODUCT BORIVALI (WEST) REQUIRED 1/3 YEARS EXPERIENCE TALLY OPERATOR, HAVING KNOWLEDGE OF GST compliance, Finalisation of accounts, PREFREABLY DAHISAR TO KANDIVALI: **9930160151, 9137849839,** sales@sdagroup.in {NC260391}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260031}

**-: वाचकांना सूचना :-**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# दिल्लीत आग! जिना कुलूपबंद १ वर्षाच्या बाळासह ९ जणांचा मृत्यू

**आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट नाही**

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्लीतील शाहदरा परिसरातील विवेक विहार येथे आज पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीने संपूर्ण परिसर हादरला. ४ मजली निवासी इमारतीला लागलेल्या आगीत कुलूपबंद जिन्यामुळे अनेक रहिवासी अडकले आणि ४ पुरुष, ४ महिला आणि १ वर्षाच्या बाळासह ९ जणांचा मृत्यू झाला. या घटनेत ४ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये छोटे लाल (६०), त्यांचा मुलगा अरविंद, अनिता जैन (५८), निशांत जैन (३५), आंचल जैन (३३) एक वर्षाचा मुलगा, तर नितीन जैन (५०), त्यांची पत्नी शैले जैन (४८) आणि मुलगा सम्यक जैन (२५) यांचा समवेश आहे.

या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या तब्बल १२ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि बचावकार्य सुरू केले. त्यांनी १० ते १५ जणांना बाल्कनी आणि खिडक्यांमधून बाहेर काढले. आग लागल्यानंतर काही क्षणातच ज्वाळांनी इमारतीतील दुसरा, तिसरा आणि चौथा मजला वेढला. धूर मोठ्या प्रमाणात पसरल्यामुळे अनेक रहिवासी अडकले. विशेष म्हणजे, इमारतीतील जिना कुलूपबंद असल्याने अनेकांना बाहेर पडता आले नाही. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांचे मृतदेह वेगवेगळ्या ठिकाणी आढळले. पहिल्या मजल्यावरून एका महिलेचा मृतदेह सापडला, तर दुसऱ्या मजल्यावरून पाच जणांचे मृतदेह मिळाले. जिन्यातील कुलूपबंद भागात तीन जण मृतावस्थेत आढळले. काही मृतदेह इतके जळाले होते की त्यांची ओळख पटवणे कठीण झाले असून, डीएनए चाचणीद्वारे ओळख निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार एसीमध्ये स्फोट होणे किंवा शॉर्टसर्किट ही आगीची संभाव्य कारणे असू शकतात. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेवर प्रतिक्रिया देताना दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दुःख व्यक्त केले. जखमींवर सर्वोत्तम उपचार केले जात आहे.

# उ.प्रदेशच्या मिरानपुरात आईनेच ४ मुलांची हत्या केल्याने खळबळ

■ मिरानपूर

**उत्तर** प्रदेशच्या आंबेडकर नगरमधील मिरानपूरमधील घरात आईनेच जड वस्तूने वार करून ४ मुलांची हत्या केली. त्यानंतर तिने घराला आतून कुलूप लावले आणि ती बाल्कनीतून फरार झाली. सौदीत राहणाऱ्या मुलांच्या वडिलांनी केलेल्या कॉलला न उचलल्याने त्यांनी आपल्या नातेवाईकांना घरी पाठवले. त्यानंतर ही बाब उघड झाली.

पती नियाझने ४ वर्षांपूर्वी मिरानपूरमध्ये आपली पत्नी गसिया खातूनच्या नावावर जमीन खरेदी करून तिथे घर बांधले होते. गसिया आपली मुले शफीक (१४), सौद (१२), उमर (१०) आणि मुलगी बयान (८) यांच्यासोबत राहत होती. पोलीस अधीक्षक प्राची सिंग यांनी सांगितले की, दुपारपर्यंत मुलांशी फोनवर संपर्क होऊ न शकल्यामुळे नियाझने शहाजहानपूर येथे राहणाऱ्या




आपली मेहुणी बकितुनिषा हिच्याशी संवाद साधला. त्यानंतर नातेवाईकांना घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर नातेवाईकांनी पोलिसांना माहिती दिली. दुपारी ३ वाजता पोलीस पोहोचले. त्यांनी बाल्कनीवर चढून मुख्य दरवाजा उघडला. पहिल्या मजल्यावरील एका खोलीत मुलांचे मृतदेह एका खाटेवर पडलेले आढळले.

## देश विदेश

# अमेरिका जर्मनीमधून ५,००० लष्कर मागे घेणार

■ न्यूयॉर्क

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि जर्मनचे चॅन्सेलर फ्रेडरिक मेर्झ यांच्यातील इराणसोबतच्या युद्धावरून वाद सुरू असताना अमेरिकेच्या संरक्षण



विभागाने जर्मनीमधून ५,००० लष्कर मागे घेण्याची योजना आखली. डोनाल्ड ट्रम्प यांनी इटली आणि स्पेनमधून अमेरिकी सैन्य मागे घेण्याचा प्रस्तावही मांडला आहे.

जर्मनीत अमेरिकेचे सैनिक मोठ्या प्रमाणात असून, गेल्या डिसेंबरपर्यंत जर्मनीतील तळांवर ३६,००० हून अधिक सक्रिय सैनिक तैनात आहेत.

पेंटागॉनचे प्रवक्ते शॉन पार्नेल यांनी सांगितले की, जर्मनीमधील अमेरिकी सैनिक मागे घेण्याबाबतचा आदेश संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांच्याकडून आला होता. युरोपमधील विभागाच्या सैन्य तैनातीचा सखोल आढावा घेतल्यानंतर आणि जमिनीवरील परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस यांनी बर्लिनमध्ये सांगितले की, युरोपमध्ये आणि विशेषतः जर्मनीमध्ये अमेरिकन सैनिकांची उपस्थिती आमच्या आणि अमेरिकेच्या हिताची आहे. सैन्य मागे घेईल, ही बाब अपेक्षित होती.

# कॅलगरी शोमध्ये दोसांझ यांचा खलिस्तानी समर्थकांना इशारा

■ कॅलगरी

**पंजाबी** आणि बॉलिवूड गायक दिलजीत दोसांझ सध्या आपल्या ऑरा वर्ल्ड टूरमुळे चर्चेत आहेत. अमेरिकेतील कॅलगरी येथे झालेल्या त्यांच्या शोदरम्यान एक वेगळाच प्रसंग घडला. कार्यक्रमादरम्यान काही खलिस्तानी समर्थकांनी पोस्टर दाखवत त्यांना विरोध दर्शवण्याचा प्रयत्न केला. त्यावर दिलजीत यांनी स्टेजवरूनच तीव्र प्रतिक्रिया दिली.



नेहमी शांत आणि संयमी राहणारे दिलजीत यावेळी संतापलेले दिसले. त्यांनी सिद्धू मूसेवालाच्या शैलीत मांडीवर थाप मारत, ज्याला यायचे आहे, त्याने मैदानात यावे. मी त्याला उचलून बाहेर फेकून देईन, असा इशारा दिला. यावेळी दिलजीत यांनी विरोधकांना म्हटले की, विरोध करणाऱ्यांनी पंजाबसाठी नेमके काय केले? पंजाबमध्ये आलेल्या पुराच्या काळात मी स्वतः पुढाकार घेऊन

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

लोकांना मदत केली, घरे उभी केली आणि सहा महिने लोकांमध्ये जाऊन मदतकार्य केले. मी राष्ट्रीय असो किंवा आंतरराष्ट्रीय, कोणत्याही व्यासपीठावर जातो, तेव्हा मी नेहमी पंजाबबद्दल बोलतो. त्यासाठी कोणी माझा विरोध करत असेल, तर त्यांनी तो करावा.

# पवना नदीत बुडून तीन तरुणांचा मृत्यू

■ मावळ

**मावळच्या** थुगाव गावाजवळील पवना नदी पात्रात बुडून पुण्यातील तिघा तरुणांचा मृत्यू झाला. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या मित्रांवर काळाने घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतांमध्ये प्रथमेश शिंदे, अश्विन भालेराव आणि आयान शेख यांचा समावेश आहे. ही घटना दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. हे तिघे मित्र पुणे शहरातून सुट्टी निमित्त फिरण्यासाठी पवना धरण परिसरात आले होते. थुगाव हद्दीतील नदीपात्रात पोहण्यासाठी उतरल्यावर पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तिघेही बुडाले.

# ५ राज्यांतील निवडणुकीचा आज निकाल! ममता, स्टॅलिन गढ राखणार?

पान १ वरून

सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपाची सत्ता आहे. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने ६० जागा जिंकल्या होत्या. तिथे भाजपा सत्ता राखेल, असा चाचण्यांचा कल आहे. तर केंद्रशासित पुदुचेरीत ऑल इंडिया एन आर काँग्रेसचे मुख्यमंत्री एन. रंगास्वामी पुन्हा एकदा सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील आहेत. काँग्रेस आणि द्रमुक आघाडीने त्यांना जोरदार टक्कर दिली आहे.

सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. दुपारी १२ वाजेपर्यंत बहुतांश राज्यांचे कल स्पष्ट होतील. मात्र, निकालानंतर संभाव्य फोडाफोडीच्या भीतीने आज राजकीय हालचालींना वेग आला. आसाममध्ये काँग्रेस आणि तामिळनाडूत द्रमुक (डीएमके) पक्ष सतर्क झाले असून, आमदारांची एकजूट कायम ठेवण्यासाठी विशेष रणनीती आखण्यात आली आहे. आसाममध्ये काँग्रेसने 'हॉटेल पॉलिटिक्स'चा मार्ग अनुसरत आपल्या आमदारांना सुरक्षित स्थळी ठेवण्याची तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हे गुवाहाटीत दाखल झाले आहेत. आमदारांना एकत्र ठेवणे, त्यांचे संरक्षण करणे आणि संभाव्य फोडाफोडी रोखणे यासाठी हा दौरा असल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे.

शिवकुमार यांचा 'हॉटेल पॉलिटिक्स' चा दांडगा अनुभव असल्याने काँग्रेसने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. ते म्हणाले की, मी आमच्या आमदारांचे संरक्षण, मार्गदर्शन आणि मदत करण्यासाठी येथे आलो आहे. आसाममध्ये मतदानात यंदा ८५.३८ टक्के मतदानाची नोंद झाली असून, २०२१ च्या तुलनेत सुमारे ३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढलेल्या मतदानामुळे निकालाबाबत अनिश्चितता वाढली आहे. शिवकुमार यांनी एक्झिट पोलवर टीका करताना ते अत्यल्प नमुन्यावर आधारित असल्याचे म्हटले, तर भूपेश बघेल यांनी त्यांना 'कॉपी-पेस्ट प्रकार' म्हणत त्यांच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दोन्ही नेत्यांनी काँग्रेस आघाडी सत्तेत येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

तामिळनाडूमध्येही द्रमुक आणि काँग्रेस आघाडीबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी पक्षाच्या मुख्यालयात बैठक घेतली. यावेळी तामिळनाडू काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सेल्वा पेरुंदगाई यांनी स्टॅलिन यांची भेट घेतली. ही केवळ सदिच्छा भेट असल्याचे दोन्ही पक्षांनी सांगितले. द्रमुकचे ज्येष्ठ नेते सर्वनन यांनी सांगितले की, आमच्या आघाडीत कोणतीही बिघाडी नाही. माध्यमांनीच अनावश्यक चर्चा सुरू केली आहे. निकालानंतरही ही आघाडी कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील तमिळगा वेट्री कझगम पक्षही निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. विजय यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मतमोजणीच्या दिवशी शिस्त राखण्याचे आणि इतर कोणत्याही पक्षाशी संपर्क न ठेवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. विजय मिळाल्यास सर्वांनी थेट पक्षाच्या मुख्यालयात एकत्र यावे, असेही त्यांनी सांगितले आहे. एक्झिट पोलनी तामिळनाडूत द्रमुकला बहुमताचा अंदाज वर्तवला असला तरी भाजपा-नेतृत्वाखालील एनडीएला ८५ ते १०० जागा मिळू शकतात, असेही भाकीत काही सर्वेक्षणांनी नोंदले आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी — रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 03/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-00 : 8919**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0082 | 1100 | 1328 महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी | 2693 विराग एन्टरप्रायझेस, नाशिक | 3143 | 3732 | 5975 | 6192 | 6921 | 7435 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0765 | 1030 | 2293 | 3518 | 4628 | 4965 | 6609 | 7709 | 8177 | 9412 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0291 | 1360 | 1744 | 3055 | 3481 | 5847 | 6741 | 7981 | 8972 | 9082 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0280 | 0759 | 1753 | 1866 | 2889 | 3396 | 4409 | 5519 | 9602 | 9630 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) — सहावे बक्षिस रु. 100/-

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1254 | 2142 | 3286 | 3934 | 4874 | 5535 | 6346 | 7217 | 8068 | 9323 |
| | | 1288 | 2214 | 3334 | 3968 | 4909 | 5537 | 6350 | 7267 | 8129 | 9362 |
| 0017 | 0640 | 1442 | 2265 | 3336 | 4054 | 4948 | 5546 | 6433 | 7397 | 8203 | 9373 |
| 0048 | 0644 | 1457 | 2276 | 3374 | 4179 | 4957 | 5558 | 6466 | 7407 | 8251 | 9391 |
| 0050 | 0695 | 1563 | 2290 | 3380 | 4200 | 5075 | 5565 | 6475 | 7432 | 8360 | 9534 |
| 0055 | 0700 | 1653 | 2294 | 3381 | 4240 | 5098 | 5566 | 6576 | 7494 | 8364 | 9561 |
| 0076 | 0733 | 1654 | 2307 | 3382 | 4254 | 5135 | 5631 | 6621 | 7561 | 8388 | 9567 |
| 0081 | 0773 | 1655 | 2352 | 3384 | 4358 | 5138 | 5658 | 6643 | 7562 | 8471 | 9580 |
| 0168 | 0809 | 1719 | 2375 | 3390 | 4405 | 5155 | 5666 | 6658 | 7570 | 8558 | 9613 |
| 0191 | 0827 | 1742 | 2420 | 3414 | 4409 | 5158 | 5765 | 6676 | 7630 | 8608 | 9674 |
| 0211 | 0841 | 1777 | 2627 | 3423 | 4416 | 5185 | 5815 | 6679 | 7643 | 8626 | 9720 |
| 0217 | 0852 | 1811 | 2687 | 3505 | 4433 | 5195 | 5882 | 6724 | 7671 | 8738 | 9733 |
| 0286 | 0860 | 1883 | 2711 | 3510 | 4442 | 5207 | 5905 | 6765 | 7707 | 8801 | 9759 |
| 0327 | 0883 | 1911 | 2845 | 3541 | 4444 | 5211 | 6062 | 6766 | 7754 | 8818 | 9853 |
| 0420 | 0899 | 1913 | 2997 | 3559 | 4494 | 5215 | 6073 | 6815 | 7779 | 8830 | 9897 |
| 0450 | 0910 | 1951 | 3013 | 3592 | 4503 | 5275 | 6104 | 6828 | 7786 | 8856 | 9899 |
| 0502 | 1053 | 1965 | 3023 | 3649 | 4505 | 5320 | 6149 | 6966 | 7790 | 8865 | 9909 |
| 0543 | 1130 | 1992 | 3034 | 3654 | 4580 | 5355 | 6180 | 7004 | 7808 | 8878 | 9923 |
| 0579 | 1153 | 2020 | 3077 | 3669 | 4671 | 5450 | 6186 | 7073 | 7851 | 8903 | 9934 |
| 0590 | 1183 | 2022 | 3217 | 3883 | 4809 | 5492 | 6253 | 7109 | 7872 | 8917 | 9936 |
| 0613 | 1196 | 2072 | 3240 | 3885 | 4824 | 5512 | 6262 | 7114 | 7881 | 9019 | 9956 |
| 0631 | 1211 | 2104 | 3257 | 3890 | 4854 | 5533 | 6289 | 7175 | 8052 | 9306 | 9958 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता.४/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| २ | ७ | ० |
| २३ | ७० | ०५ |
| २९ | ७३ | ०१ |
| २३७ | २५० | ५६९ |
| ५७० | ३७८ | ५५० |

# लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी — विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 03/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MO-03 : 7874**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1197 | 1969 | 2305 | 4159 रुक्मणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद | 5536 | 6293 | 6540 | 7251 | 8702 | 8944 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1198 | 1925 | 1989 | 2434 | 4374 | 6606 | 6903 | 7690 | 7985 | 8914 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 4085 | 4636 | 5067 | 5592 | 6348 | 6556 | 8072 | 8298 | 9407 | 9916 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी) — पाचवे बक्षिस रु. 300/-

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1197 | 2464 | 3836 | 4475 | 5259 | 6576 | 7677 | 8833 |
| | 1462 | 2726 | 3942 | 4491 | 5291 | 6602 | 7899 | 8835 |
| 0029 | 1464 | 2768 | 3970 | 4544 | 5554 | 6624 | 8017 | 8845 |
| 0031 | 1741 | 2820 | 4025 | 4568 | 5558 | 6679 | 8019 | 9064 |
| 0367 | 1818 | 3122 | 4125 | 4638 | 5573 | 6696 | 8183 | 9244 |
| 0451 | 1920 | 3346 | 4142 | 4860 | 5605 | 6725 | 8286 | 9421 |
| 0839 | 1938 | 3355 | 4171 | 4924 | 5655 | 6730 | 8383 | 9542 |
| 0865 | 1994 | 3363 | 4209 | 4988 | 5662 | 7078 | 8509 | 9580 |
| 0996 | 2078 | 3609 | 4220 | 5066 | 5722 | 7443 | 8594 | 9649 |
| 1075 | 2205 | 3635 | 4386 | 5116 | 6066 | 7486 | 8638 | 9870 |
| 1091 | 2274 | 3666 | 4413 | 5157 | 6254 | 7509 | 8728 | 9919 |
| 1134 | 2293 | 3747 | 4424 | 5224 | 6397 | 7530 | 8806 | 9966 |
| 1137 | 2458 | 3833 | 4447 | 5250 | 6506 | 7539 | 8826 | 9988 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव — विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 03/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-08 : 0965**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — 3810 — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

तिसरे बक्षिस रु. 2000/- — 2049 — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0214 | 0561 | 2008 | 3073 | 5991 | 6504 | 6841 | 7599 | 8288 | 8548 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1046 | 2033 | 3713 | 3781 | 5691 | 5778 | 6149 | 6569 | 7999 | 9141 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0516 | 0542 | 0977 | 1452 | 2675 | 2709 | 2733 | 3358 | 3850 | 4586 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) — सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1542 | 2317 | 3382 | 4254 | 5198 | 6266 | 7061 | 7968 | 8988 |
| | | 1596 | 2342 | 3385 | 4277 | 5255 | 6276 | 7121 | 8006 | 9035 |
| | | 1639 | 2356 | 3386 | 4343 | 5267 | 6307 | 7165 | 8039 | 9069 |
| 0007 | 0650 | 1687 | 2362 | 3391 | 4368 | 5351 | 6365 | 7243 | 8164 | 9126 |
| 0021 | 0727 | 1813 | 2420 | 3476 | 4404 | 5415 | 6435 | 7270 | 8177 | 9149 |
| 0041 | 0906 | 1818 | 2467 | 3529 | 4406 | 5441 | 6606 | 7358 | 8205 | 9277 |
| 0048 | 0910 | 1851 | 2552 | 3531 | 4431 | 5500 | 6622 | 7407 | 8219 | 9299 |
| 0051 | 0912 | 1882 | 2642 | 3594 | 4489 | 5520 | 6673 | 7411 | 8287 | 9300 |
| 0073 | 0989 | 1885 | 2756 | 3638 | 4684 | 5535 | 6688 | 7445 | 8298 | 9355 |
| 0091 | 1021 | 1888 | 3056 | 3647 | 4733 | 5551 | 6690 | 7469 | 8348 | 9394 |
| 0100 | 1087 | 1914 | 3080 | 3682 | 4776 | 5553 | 6746 | 7527 | 8365 | 9474 |
| 0139 | 1093 | 1918 | 3132 | 3684 | 4791 | 5651 | 6749 | 7707 | 8414 | 9544 |
| 0173 | 1101 | 2023 | 3213 | 3835 | 4823 | 5692 | 6771 | 7743 | 8501 | 9603 |
| 0183 | 1115 | 2107 | 3262 | 3853 | 4850 | 5737 | 6834 | 7770 | 8523 | 9619 |
| 0261 | 1123 | 2110 | 3288 | 4021 | 4944 | 5741 | 6875 | 7771 | 8584 | 9749 |
| 0388 | 1146 | 2123 | 3290 | 4085 | 4990 | 5743 | 6927 | 7775 | 8667 | 9873 |
| 0516 | 1165 | 2219 | 3346 | 4104 | 5030 | 5763 | 6966 | 7777 | 8675 | 9889 |
| 0547 | 1166 | 2224 | 3349 | 4124 | 5050 | 5866 | 6974 | 7806 | 8689 | 9906 |
| 0585 | 1412 | 2232 | 3362 | 4151 | 5060 | 5891 | 7021 | 7834 | 8808 | 9917 |
| 0610 | 1509 | 2236 | 3374 | 4152 | 5065 | 5959 | 7022 | 7876 | 8874 | 9928 |
| 0615 | 1541 | 2249 | 3377 | 4163 | 5159 | 6095 | 7036 | 7950 | 8951 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी



# आजचे राशी भविष्य

सोमवार ता. ४ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | रागावर नियंत्रण ठेवा. नोकरीत सौहार्दपूर्ण वागणूक महत्त्वाची ठरेल. अनपेक्षित धनलाभ संभवतो. |
| वृषभ | अतिशय उत्साही राहाल. कामे जलद पूर्ण होतील. दीर्घकालीन हिताचे काही निर्णय घेता येतील. |
| मिथुन | संमिश्र फलितांचा दिवस. संयम व शांतचित्ताने दिवस व्यतीत करा. जोडीदाराशी जुळवून घ्या. |
| कर्क | कामात मन गुंतवणे योग्य ठरेल. वेळेचे नियोजन आज अधिक महत्त्वाचे राहील. नातेसंबंधात संयम बाळगा. |
| सिंह | सकारात्मक दृष्टीकोन हिताचा ठरेल. सर्वांशी मैत्रीपूर्ण वर्तन ठेवा. नकारात्मकतेला थारा देऊ नका. |
| कन्या | उत्साहपूर्ण दिवस. कार्यक्षेत्रात सुप्त गुणांना वाव मिळेल. वरिष्ठांकडून प्रशंसा लाभेल. |
| तूळ | स्पष्ट बोलणे फायद्याचे ठरेल. आज कामात मन लागणार नाही. सहकाऱ्यांशी संयमाने वागा. |
| वृश्चिक | हुशारीने पावले उचला. अनावश्यक आणि अतिविचार टाळा. भावनांचा अतिरेक नको. |
| धनु | दिवसाची सुरुवात अडखळत होईल. मात्र नंतर वाटचाल सुरळीत होईल. आज कठोर मेहनत अतिशय गरजेची असेल. |
| मकर | संमिश्र फलितांचा दिवस. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाका. कठोर मेहनत घ्यावी लागेल. |
| कुंभ | झटपट महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूलता राहील. वारसाहक्क अथवा अन्य मार्गाने अनपेक्षित धनलाभाचा संभव. |
| मीन | पैशाचा जोरदार ओघ राहील. मात्र खर्च टाळून बचतीला प्राधान्य देणे हिताचे ठरेल. आज थंड पदार्थ खाणे टाळा. |

# दिल्लीमध्ये न्यायाधीशाची गळफास घेऊन आत्महत्या

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** सफदरजंग परिसरात एका न्यायाधीशाने आज दुपारी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली. याप्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असला तरी त्यांनी आत्महत्या कोणत्या कारणामुळे केली, हे मात्र अद्याप उघड झालेले नाही.

अमन कुमार शर्मा, असे आत्महत्या केलेले न्यायाधीशाचे नाव आहे. एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आत्महत्येबाबत कॉल डिफेन्स कॉलनी येथील रहिवासी शिवमने केला होता. त्याने स्वतःची ओळख अमन यांचा मेहुणा म्हणून सांगितली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. शवविच्छेदन अहवाल लवकरच प्रसिद्ध केला जाईल. अमन करकरडूमा न्यायालयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणात (डीएलएसए) सचिवपदावर कार्यरत होते.

# जे व्हायचे ते होऊ द्या! नेकनूर राड्यानंतर जरांगेंचा इशारा

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील नेकनूर येथे घडलेल्या तणावपूर्ण घटनेनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले. 'जे व्हायचे ते होऊन जाऊ द्या' असा त्यांनी दिलेला इशारा चर्चेचा विषय ठरला आहे.

नेकनूर २ गटातील वादावर मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, आमच्यावर कितीही केसेस दाखल झाल्या तरी आम्हाला त्याची भीती नाही. आम्हाला नोकऱ्या लागणार नाहीत. जे व्हायचे ते होऊ द्या. त्याचबरोबर त्यांनी समाजाला शांततेचे आवाहनही केले. सर्व समाजातील लोक एकत्र गुण्यागोविंदाने राहतात. फक्त दोन-चार लोक चुकीचे वागतात म्हणून संपूर्ण समाजाला दोष देणे चुकीचे आहे. त्यामुळे दोन्ही गटांनी संयम ठेवावा.

दरम्यान नेकनूरच्या बंकटस्वामी संस्थानच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमादरम्यान किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले. या घटनेत महिलांसह एका लहान मुलालाही मारहाण झाली. वाद चिघळल्यानंतर दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली.

# सामूहिक कॉपी भोवली! २४३ विद्यार्थ्यांवर कारवाई

■ नागपूर

**बारावीच्या** परीक्षेत सामूहिक कॉपी केल्याप्रकरणी शिक्षण मंडळाने २४३ विद्यार्थ्यांवर मोठी कारवाई केली आहे. वर्धा आणि गोंदिया जिल्ह्यातील दोन परीक्षा केंद्रांवर हा प्रकार उघडकीस आला होता. आता या दोन्ही परीक्षा केंद्रांची मान्यता कायमची रद्द केली आहे.



काल बारावीच्या निकालासोबतच या कारवाईची घोषणा करण्यात आल्याने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. पेपर तपासणीदरम्यान शिक्षकांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर मंडळाने सखोल चौकशी सुरू केली होती. चौकशीत सामूहिक कॉपी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली. अलीकडच्या काळात एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांवर कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ

**२ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द**

असल्याचे सांगितले जात आहे. या कठोर निर्णयामुळे कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोलापुरात प्लास्टिकच्या कारखान्याला आग

■ सोलापूर

**सोलापूर** शहरातील नई जिंदगी परिसर येथे पहाटे ४ वाजता एका प्लास्टिक कारखान्याला भीषण आग लागली. काही वेळातच आगीने विक्राळ रूप धारण केले. या आगीत कारखान्यातील माल जळून खाक झाला असून, आर्थिक नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# ताडोबात मचाण जनगणनेत ४२ वाघ, १३ बिबट्यांची नोंद

■ चंद्रपूर

**चंद्रपूरच्या** ताडोबा-अंधारी व्याघ्र अभयारण्य येथे नुकतीच वार्षिक मचान जनगणना करण्यात आली. बुद्ध पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला झालेल्या या उपक्रमात तब्बल ५,७६५ वन्यजीव दिसल्याची नोंद झाली. या जनगणनेत ४२ वाघ आणि १३ बिबट्यांचे दर्शन विशेष ठरले.

वाघांपैकी गाभा क्षेत्रात १९ तर बफर क्षेत्रात २३ वाघांची नोंद झाली. बिबट्यांमध्ये गाभा क्षेत्रात ५ आणि बफर क्षेत्रात ८ बिबट्यांचे दर्शन झाले. या आकडेवारीवरून अभयारण्यात भक्षक प्रजातींची मजबूत उपस्थिती अधोरेखित झाली आहे. कडक



उन्हाळ्यात पाणवठ्यांवर एकत्र येणाऱ्या वन्यजीवांचे निरीक्षण करून त्यांची संख्या जाणण्यासाठी ही मचान जनगणना केली जाते. यामध्ये वन विभागासोबत नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गाभा क्षेत्रात ९९ मचाण उभारण्यात आली होती आणि २०१ जणांनी सहभाग घेतला, तर बफर क्षेत्रात ६९ मचाण उभारण्यात आली होती. त्यापैकी ५४ मचाण ऑनलाईन आरक्षित करण्यात आली होती आणि २१० नागरिक यात सहभागी झाले.

एकूण दर्शनांपैकी शाकाहारी प्राणी ३,०८९ (५३.६%), सर्वभक्षी १,५०० (२६%), पक्षी ५७३ (९.९%), महाकाय मांसाहारी २०९ (३.६%) आणि लहान मांसाहारी २१२ (३.७%) इतकी नोंद झाली. चितळ १,७०० हून अधिक, सांबर ६०० हून अधिक आणि गवे ५०० हून अधिक मोजण्यात आले. याशिवाय नीलगाय, भेकर, रानडुक्कर, मगर आणि विविध पक्ष्यांचीही नोंद करण्यात आली. क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला यांनी सांगितले की, या जनगणनेतून मिळालेली माहिती वन्यजीव संवर्धन आणि अधिवास व्यवस्थापनासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल.

# गडचिरोलीत शासकीय आदिवासी मुलींच्या वस्तीगृहात सिलिंडर स्फोट

■ गडचिरोली

**गडचिरोली** जिल्ह्यातील आष्टी येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वस्तीगृहात सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

वस्तीगृहाच्या स्वयंपाकघरात अचानक सिलिंडरचा स्फोट झाला आणि त्यानंतर आग भडकली. या घटनेमुळे वस्तीगृहातील मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, काही काळ परिसरात गोंधळ उडाला. धक्कादायक बाब म्हणजे, वस्तीगृहात अग्निशमनाची कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याचे उघड झाले आहे. तसेच घटनेच्या वेळी जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी अनुपस्थित असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग वेळेत आटोक्यात आली आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर वस्तीगृहातील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत असून, संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# विलास कोळेकर यांचा सेवानिवृत्ती सोहळ्यात गौरव

■ रत्नागिरी

**सैतवडे** येथील दि मॉडेल इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक विलास कोळेकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित समारंभ उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. शिस्त, दूरदृष्टी आणि उपक्रमशीलतेच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या कोळेकर यांच्या प्रदीर्घ सेवेला यावेळी मान्यवरांनी सलाम करत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

महादेव जानकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने साधलेल्या सर्वांगीण प्रगतीचीही दखल घेण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या पद्मश्री दादा इदाते यांनीही कोळेकर यांच्या कार्याची प्रशंसा करत गौरवोद्गार



काढले. तर कोळेकर यांनीही मनोगतातून सेवाकाळातील अनुभव सांगत सर्वांचे आभार मानले.

# भाईंदरमध्ये पुन्हा आग अनेक झोपड्या खाक



■ भाईंदर

**भाईंदर** पूर्व येथील प्रभाग क्रमांक १२ मधील भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयाजवळ असलेल्या झोपडपट्ट्यांना काल सायंकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली.

या आगीत अनेक झोपडपट्ट्या पूर्णपणे जळून खाक झाल्या. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मागील महिन्यात भाईंदरच्या इंद्रलोक परिसरातील झोपडपट्टीला आग लागून तीन जणांचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच काल संध्याकाळी पुन्हा एकदा मिरा रोडच्या रामदेव पार्क येथील भाजपा जिल्हा कार्यालयामागे असलेल्या एका अनधिकृत झोपडपट्टीला आग लागली आहे. आगीच्या ज्वाळा उंच पसरल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली होती.

आग लागण्याचे नेमके कारण अस्पष्ट असून, अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. या घटनेमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिरा-भाईंदरमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.



# संजय गांधी उद्यानातील दरवाढ नागरिकांच्या विरोधानंतर स्थगित

■ मुंबई

**बोरिवली** पूर्व येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील पर्यटक शुल्क आणि प्रभात फेरी शुल्कात करण्यात आलेल्या प्रचंड दरवाढीला तीव्र विरोधानंतर तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. या दरवाढीविरोधात नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि नियमित मॉर्निंग वॉक करणाऱ्यांमध्ये मोठी नाराजी व्यक्त होत होती.

उद्यानातील काही शुल्क श्रेणींमध्ये मोठी वाढ प्रस्तावित करण्यात आली होती. काही प्रकरणांत शुल्क थेट वर्षाला ३४८ रुपयांवरून १० हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव होता. यामध्ये वार्षिक पास ३८३ रुपयांवरून १० हजार रुपये, तर ज्येष्ठ नागरिकांसाठी ४५ रुपयांवरून ५ हजार रुपये करण्याचा प्रस्ताव होता. या निर्णयाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उबाठाने तीव्र आक्षेप घेत आंदोलनाचा इशारा दिला होता. स्थानिक नागरिकांनीही या दरवाढीला अन्यायकारक ठरवत विरोध दर्शवला. वाढता विरोध लक्षात घेऊन महसूल आणि वन विभागाने प्रस्तावित दरवाढीच्या अंमलबजावणीला तात्पुरता ब्रेक लावला आहे. काही दिवसांपूर्वी हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता तसेच नवीन तिकीट प्रणाली लागू करण्याचाही निर्णय घेण्यात आला होता. उबाठा गटाच्या वतीने उद्यान प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले असून, ही स्थगिती तात्पुरती न ठेवता वाढवलेले दर कायमस्वरूपी रद्द करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कर्जत-मुरबाड महामार्गावर अपघात! एकाचा मृत्यू

■ कर्जत

**कर्जत-मुरबाड** महामार्गावर भोईरवाडी गावाजवळ अपघात होऊन एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. सापेले गावचे रहिवासी महेश परशुराम मोरे (४८) हे कर्जत येथील काम आटोपून दुचाकीवरून आपल्या गावी परतत होते. यावेळी भोईरवाडी जवळ समोरून येणाऱ्या बुलेट दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात महेश मोरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून, फरार चालकाचा शोध पोलीस घेत आहेत.

# नवापूरमध्ये बर्ड फ्ल्यूचा तिसऱ्यांदा उद्रेक चिकन-विक्री बंद ठेवण्याचे आदेश

■ नंदुरबार

**नंदुरबार** जिल्ह्यातील नवापूर परिसरात बर्ड फ्ल्यूचा पुन्हा उद्रेक झाल्याने खळबळ उडाली आहे. शहरात तिसऱ्यांदा या संसर्गाचा शिरकाव झाल्याने प्रशासनाने कठोर उपाययोजना सुरू केल्या आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नगरपरिषदेकडून शहरातील सर्व चिकन दुकाने आणि बिर्याणी सेंटर बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चिकन, अंडी आणि बिर्याणी विक्रीवर पूर्ण बंदी घालण्यात आली असून, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

या अचानक निर्णयामुळे स्थानिक पोल्ट्री व्यावसायिक आणि लहान विक्रेत्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. शहरात भीतीचे वातावरण असले तरी नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बाधित क्षेत्रातील एक किलोमीटर परिघातील कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ४४ हजार कोंबड्यांचे कलिंग करण्यात आले असून २० हजार अंडी नष्ट करण्यात आली आहेत.



# ‘सारंगा’ फेम ज्येष्ठ अभिनेते सुदेश कुमार यांचे निधन

■ मुंबई

**ज्येष्ठ** अभिनेते आणि निर्माते सुदेश कुमार यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना सोमवारी ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यांच्या इच्छेनुसार कुटुंबीयांनी त्यांना पुन्हा घरी आणले. शुक्रवारी त्यांचे निधन झाले. १९६० च्या दशकातील हे लोकप्रिय अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचे ते दूरचे नातेवाईक होते. त्यांनी ‘सारंगा’, ‘छोटी बहन’ आणि ‘खानदान’ यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले होते.

सुदेश कुमार यांनी १९६० च्या दशकात काही हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. ‘सारंगा’ या चित्रपटातील त्यांच्या वैविध्यपूर्ण अभिनयामुळे त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. सुदेश कुमार यांचा जन्म १९३१ मध्ये पेशावर येथे झाला. ते लहान असतानाच त्यांचे कुटुंब मुंबईला स्थलांतरित झाले.

एल्फिन्स्टन कॉलेजमधून सुदेश कुमार यांनी विज्ञान शाखेत पदवी घेतली. त्यांनी डॉक्टर व्हावे, अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. मात्र त्यांनी अभिनय क्षेत्र निवडले. अभिनय कारकिर्दीच्या सुरुवातीला सुदेश कुमार पृथ्वीराज कपूर यांच्या नाट्यगटात सामील झाले. तिथूनच त्यांनी अभिनयाचे धडे गिरवले.



चर्चगेट येथील के. सी. कॉलेजजवळ रस्त्याच्या कामासाठी खोदकाम सुरु आहे. मात्र एक मर्सिडीज कार खड्ड्यात जाता जाता वाचली.
(छाया: दीपक साळवी)

# बदलापूर स्थानकात लोकल थांब्यात बदल



■ बदलापूर

**मध्य** रेल्वेवरील अत्यंत वर्दळीच्या बदलापूर स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू असलेल्या शेड उभारणीच्या कामामुळे कर्जत आणि खोपोलीकडे जाणाऱ्या लोकल गाड्यांच्या थांब्यात तात्पुरता बदल करण्यात आला आहे. या गाड्या आता नेहमीच्या ठिकाणापेक्षा कल्याणच्या दिशेने ३ डबे मागे थांबत आहेत.

प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर पत्र्याची शेड नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात प्रवाशांना पावसात भिजत लोकलची वाट पाहावी लागत होती. ही समस्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अखेर शेड उभारणीचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे काम सुरू असताना सुरक्षेच्या कारणास्तव हा बदल करण्यात आला आहे. या बदलामुळे अनेक प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असून, गर्दीच्या वेळी प्लॅटफॉर्मवर धावपळ आणि गोंधळ उडत आहे. इंडिकेटर आणि डब्यांचे फलक बदलण्यात आले असले तरीही, अनेक प्रवाशांपर्यंत या बदलाची माहिती पोहोचलेली नाही. दरम्यान, एकीकडे नवीन शेडचे काम सुरू असले तरी दुसरीकडे याच प्लॅटफॉर्मवरील पूर्वीचे काम अजूनही अर्धवट असल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# मराठवाड्यात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा! अनेक पंप बंद

■ धाराशिव

**मराठवाड्यातील** अनेक जिल्ह्यांमध्ये पेट्रोल-डिझेल टंचाई निर्माण झाली आहे. धाराशिव, जालना, लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांमध्ये इंधनाचा तुटवडा जाणवत असून, वाहन धारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बीड जिल्ह्यातील परळी परिसरातही इंधनाचा साठा संपल्याने पंप बंद ठेवण्याची वेळ आली आहे. केज भागातून मोठ्या प्रमाणात वाहनचालक धाराशिवमध्ये इंधनासाठी दाखल होत असल्याने तिथल्या पंपांवर प्रचंड ताण पडत आहे. कळंब-ढोकी परिसरात अनेक पेट्रोल



पंप बंद आहेत. जिल्ह्यातील बहुतांश पंपांवर पेट्रोल आणि डिझेल उपलब्ध नसल्याने शेतीच्या मशागतीची कामे ठप्प झाली आहेत. डिझेलअभावी शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. इंधन मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. परभणीत काही ठिकाणी काल रात्री पंप सुरू होताच वाहनचालकांची मोठी गर्दी झाली होती. सकाळपर्यंत पुन्हा साठा संपल्याने पंप बंद ठेवावे लागले. जालना, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यांमध्येही पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. प्रशासनाने तातडीने इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# वेरूळ लेणीत मधमाशांचा हल्ला! १०० पर्यटक जखमी

■ छत्रपती संभाजीनगर

**जागतिक** वारसा स्थळ असलेल्या वेरूळ लेणी परिसरात आज सकाळी मधमाशांनी पर्यटकांवर अचानक हल्ला केल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेत सुमारे १०० पर्यटक जखमी झाले आहेत. आज रविवार असल्याने लेणी पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होती. सकाळी १० ते ११ च्या सुमारास लेणी क्रमांक १० आणि १६ परिसरात पर्यटक असताना मधमाशांनी अचानक हल्ला चढवला. या अनपेक्षित प्रकारामुळे पर्यटकांमध्ये घबराट पसरली.

विशेषतः लहान मुले आणि वृद्धांना सुरक्षित ठिकाणी हलवताना मोठी तारांबळ उडाली. स्थानिक गाईड, विक्रेते आणि सुरक्षा रक्षकांनी तातडीने मदत करत पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढले. घटनेनंतर सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय पुरातत्व विभागाने लेणी सुमारे दोन तासांसाठी बंद ठेवली.

# शेतकरी प्रश्नांवर काँग्रेसची आज मानेगाव ते जळगाव जामोद पदयात्रा

■ बुलडाणा

**शेतकरी** प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाने अन्नदाता संघर्ष पदयात्रा आयोजित केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली उद्या ४ मे २०२६ रोजी बुलडाणा जिल्ह्यातील मानेगाव ते जळगाव जामोद दरम्यान ही पदयात्रा काढण्यात येणार आहे.

काँग्रेसकडून केंद्र व राज्यातील भाजपा महायुती सरकारवर शेतकरीविरोधी धोरणांचा आरोप करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने आणि वाढत्या महागाईमुळे शेती करणे कठीण झाल्याचा दावा पक्षाने केला आहे. राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही चिंताजनक असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

या पदयात्रेद्वारे सरसकट कर्जमाफी, शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करणे, शेतमालाला हमीभाव कायदा लागू करणे, तसेच सोयाबीन, हरभरा, कापूस आणि तुरीसाठी हमी दर वाढवण्याची मागणी करण्यात येणार आहे. याशिवाय पीककर्जावरील अटी हटवणे, प्रति एकर प्रति हंगाम ४० हजार रुपये कर्ज देणे, कृषी साहित्य जीएसटीमुक्त करणे आणि शेतमालावर प्रक्रिया उद्योग उभारण्याच्या मागण्याही करण्यात आल्या आहेत.

# मिसिंग लिंकला शिंग्रोबा नाव द्या राष्ट्रीय समाज पक्षाची मागणी

■ मुंबई

**मुंबई-पुणे** एक्स्प्रेसवेवरील मिसिंग लिंक प्रकल्पाला वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रीय समाज पक्षाकडून करण्यात आली आहे.

पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शरद दडस यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र देत ही मागणी केली आहे. बोरघाट परिसरात बलिदान दिलेल्या वीर शिंग्रोबा धनगर यांचा सन्मान व्हावा आणि त्यांच्या कार्याला योग्य ओळख मिळावी, असे त्यांनी नमूद केले आहे. शिंग्रोबानेच इंग्रजांना खंडाळा घाटाची वाट दाखवली, अशी आख्यायिका आहे. खंडाळा घाटातील शिंग्रोबा हे स्थानिकांचे श्रद्धास्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानाशी जोडलेल्या इतिहासामुळे या नामकरणाच्या मागणीला भावनिक स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि धनगर समाजाकडूनही शिंग्रोबा नावासाठी जोरदार पाठिंबा मिळत आहे. दुसरीकडे या प्रकल्पाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याचाही प्रस्ताव पुढे आला आहे.

# खाशाबा चित्रपटाच्या ट्रेलरमुळे वाद नागराज मंजुळे-देशपांडे यांना नोटीस

**तातडीची सुनावणी ८ मे रोजी होणार**

■ पुणे

**पुणे** जिल्हा व सत्र न्यायालय येथे प्रलंबित असलेला ‘खाशाबा’ चित्रपट पुन्हा चर्चेत आला आहे. ट्रेलर प्रदर्शित केल्याने न्यायालयाने निर्माती ज्योती देशपांडे, दिग्दर्शक नागराज मंजुळे तसेच जिओ स्टुडिओ आणि आटपाट प्रोडक्शन यांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची तातडीची सुनावणी ८ मे रोजी होणार आहे. भारतीय फ्रीस्टाईल कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाची घोषणा डिसेंबर २०२४ मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर लेखक संजय दुधाणे यांनी त्यांच्या पुस्तकावरील कॉपीराईट हक्कांचा दावा करत न्यायालयात याचिका दाखल केली. त्यांच्या मते, २००१ पासून संबंधित पुस्तकाचे कॉपीराईट हक्क त्यांच्या नावावर असून, त्याबाबतचे अधिकृत प्रमाणपत्रही त्यांच्याजवळ आहे.

१ मे रोजी चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. दावा प्रलंबित असतानाही ट्रेलर प्रदर्शित केल्याने दुधाणे यांच्या वकिलांनी २ मे रोजी चित्रपट प्रदर्शनावर स्थगिती आणण्यासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयाने या अर्जाची दखल घेत संबंधितांना नोटीस बजावत सुनावणी निश्चित केली आहे. या प्रकरणात दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी लेखक संजय दुधाणे यांच्याविरोधात ५ कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला आहे. या दाव्यातील शपथपत्रात चित्रपटासाठी काही संदर्भ दुधाणे यांच्या पुस्तकावर आधारित असल्याचे नमूद करण्यात आल्याचा दावा केला आहे. काही कागदपत्रांमध्ये दुधाणे यांचा कथालेखक म्हणून उल्लेख असल्याचेही सांगितले जात आहे.

# निसरे बंधाऱ्यात मगरीचे दर्शन ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

■ पाटण

**पाटण** तालुक्यातील कोयना नदीपात्रातील निसरे येथील निसरे बंधाऱ्याजवळ मगरीचे दर्शन झाल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेनंतर नदीकाठी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

या ठिकाणी दररोज गाड्या धुणे, कपडे धुणे तसेच अंघोळ आणि पोहण्यासाठी नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, आता मगरीच्या उपस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून निसरे डोहात मगरीचा वावर असल्याची चर्चा होती. अनेकांनी यापूर्वीही मगरीला पाहिल्याचा दावा केला आहे. सध्या ही मगर बंधाऱ्याच्या खालच्या बाजूस पुन्हा दिसल्याने भीती वाढली आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नदीपात्रात अंघोळ व पोहण्यासाठी युवकांची मोठी गर्दी होत असल्याने धोका अधिक वाढला आहे. त्यामुळे या मगरीचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी वनविभागाकडे केली आहे. दरम्यान, कोयना नदीपात्रात मगरींचे अस्तित्व नवीन नसून यापूर्वीही मंदुळहवेली परिसरात मगरीचे दर्शन झाले होते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# विकृतीचा वाढता विषारी विळखा

**एकीकडे** 'नारीशक्ती' किंवा 'बेटी बचाव'सारखा नारा दिला जात असताना दुसरीकडे महाराष्ट्रातल्या महिलांवरच्या अत्याचारात होत असलेली वाढ अत्यंत दुर्दैवी ठरते. नसरापूरमध्ये एका लहान मुलीवर अत्याचार करून तिची केली गेलेली हत्या तर पुणे जिल्ह्यातच चाकणजवळ महाळुंगे या गावात एका लहान मुलाचीही अशाच प्रकारे हत्या केली गेली आहे. ही घटना घडली त्याच्या एक दिवस आधीच नाशिकजवळच्या त्र्यंबकेश्वर इथे एका महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला आपल्या धर्माच्या रिवाजाची जबरदस्ती करण्याचा प्रकारही पुन्हा नव्याने उघडकीला आलेला आहे. म्हणजेच नाशिक जिल्ह्यातले खरात प्रकरण त्यापाठोपाठ गाजलेले टीसीएस प्रकरण, विदर्भात अमरावतीजवळच्या परतवाडा येथे मुलींच्या शोषणाचा असाच झालेला प्रकार या सगळ्या एकापाठोपाठ घडलेल्या घटना म्हणजे महाराष्ट्रातल्या महिलांच्या सुरक्षिततेचे पूर्ण तीन तेरा वाजले असल्याचेच म्हणावे लागते. सातत्याने जेव्हा हे प्रकार वाढतात, त्यावेळेला कायदा तर अपुरा पडतोच. पण समाजात वाढत असलेला हा विकृतीचा विळखा अधिकाधिक विष भिणवणाराच ठरतो. नसरापूरच्या घटनेनंतर संतप्त नागरीकांनी केलेला रास्ता रोको म्हणजे अशा प्रकारचे अत्याचार रोखण्यात कायदा सुव्यवस्था अपुरी ठरल्याचीच समाजाची तीव्र प्रतिक्रिया म्हणता येईल. महिला अत्याचाराविरुद्ध अनेक प्रकारचे कायदे असूनही अशा घटना वाढत जाणे याचा अर्थ कायद्याचा धाक तर उरलेला नाहीच. परंतु या तथाकथित सुव्यवस्थेला गुन्हेगारांनी पूर्ण धाब्यावर बसवल्याचेच स्पष्ट होते. ही विकृती रोखायची असेल तर तातडीने कायद्यांमध्ये सुधारणा कराव्या लागतील. असा अत्याचार करणाऱ्याला पुढच्या केवळ दोन महिन्यांत कठोर शिक्षा करण्याची वेगवान व्यवस्था निर्माण करावी लागेल. शिवाय सरकारने सातत्याने महिला अत्याचाराविरोधात व्यापक जनजागरण मोहीम राबवण्याची आवश्यकता आहे. सरकारच्या हजारो जाहीराती प्रसिद्ध होत असतात. त्यात विकासाचे आणि अगदी महिला कल्याणाचे ढोल बडवले जातात. परंतु ग्रामीण स्तरापासून ते मोठ्या शहरांमध्येसुद्धा महिलांना टार्गेट करण्याची मोठी मोहीमच पाहायला मिळते.

**कमी कालावधीत शिक्षा हवी**

सरकारने केलेल्या उपाययोजना पुरेशा नाहीत. हे या वाढत्या अत्याचार प्रकरणांमधून स्पष्ट होते. महिलांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू केली गेलेली आहे. महिलांविषयक अत्याचाराचे गुन्हे नोंदवताना स्वतंत्र महिला पोलिसांची नियुक्ती केली गेली आहे. एवढेच नव्हे तर पोलीस दलामध्ये महिलांचीही संख्या वाढवलेली आहे. अत्याचार करणाऱ्याला जन्मठेपेच्या शिक्षेची कायद्यानुसार जरी तरतूद असली तरी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन अशा अत्याचार करून हत्या करणाऱ्यांना फाशीची शिक्षा हाच एकमेव पर्याय ठरतो. परंतु जोपर्यंत असे नराधम फासावर लटकवले जात नाहीत, तोपर्यंत त्याचा परिणामही दिसणार नाही. कारण आपल्या देशात एकूणच गुन्ह्यांचा तपास, न्यायालयीन प्रक्रिया, साक्षीपुरावे या सगळ्या प्रकारामध्ये बराच मोठा काळ निघून जातो. अशावेळी जलदगती न्यायालयांचा जरी उपाय सांगितला गेला असला तरी त्याचादेखील प्रभाव आणि परिणाम पडलेला दिसत नाही. याच नराधमाने यापूर्वी अशाच अत्याचाराचे प्रकार केले आहेत. आणि धक्कादायक गोष्ट म्हणजे तो पुराव्याअभावी निर्दोष सुटलेला होता. आणि याच ठिकाणी कायदा अपयशी ठरल्याचे म्हणावे लागते. जर त्या पहिल्या दोन गुन्ह्यांमध्येच या विकृताच्या नाड्या आवळल्या गेल्या असत्या आणि त्याला कठोर शिक्षा झाली असती तर तो आज कारागृहात असता. परंतु असेच विकृत लोक या तथाकथित कायदा सुव्यवस्थेचा पुरेपूर गैरफायदा घेतात. आणि बाहेर येऊन पुन्हा तसेच अत्याचार करीत राहतात. ही परिस्थिती म्हणजे कायदा सुव्यवस्थेचेच धिंडवडे निघाल्याचे द्योतक ठरते. म्हणूनच जलदगती न्यायालयात हा खटला चालवण्याचे नुसते आश्वासन देऊन चालणार नाही तर पुढच्या कमीत कमी कालावधीत हा नराधम लवकरात लवकर फासावर लटकवला जाणे अत्यंत आवश्यक ठरते. आता सरकारच्यावतीने पीडित मुलीच्या वडिलांना पत्र देऊन या नराधमाला मृत्युदंडाचीच शिक्षा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे आश्वासन दिले गेले आहे. अशा लेखी पत्रापेक्षाही हा खटला किती वेगाने चालवला जातो. आणि अशा अत्याचारांबाबत शून्य सहनशीलता कशा प्रकारे दाखवली जाते यावर बरेच काही अवलंबून राहणार आहे.

**चोवीस तासासाठी महिला पोलीस गस्त हवी**

त्या सगळ्या प्रकाराची सामाजिक स्तरावरही गांभीर्याने दखल घेण्याची वेळ आलेली आहे. कायदा सुव्यवस्था कशा प्रकारे काम करते याची सगळ्यांना कल्पना आहे. परंतु त्याहीपेक्षा कुटुंब स्तरावर अधिक सावध राहण्याची वेळ आलेली आहे. आपल्या मुलामुलींची काळजी घेणे क्रमप्राप्त ठरते आहे. अगदी तरुण-तरुणींच्याबाबतीतही घडणारे लव्ह जिहादसारखे प्रकार आणि अनेक ठिकाणी चालणारा एकतर्फी प्रेमाचा धिंगाणादेखील वेळीच आटोक्यात आणला गेला पाहिजे. सोशल मीडियाची या सगळ्या प्रकारांमधली भूमिकाही लक्षात घेतली पाहिजे. ओळखपाळख नसताना केवळ सोशल मीडियावरच्या फ्रेंडशिपमधून प्रेमप्रकरण तयार होतात. आणि एकूणच तरुण-तरुणींची आर्थिक स्थिती, कौटुंबिक स्थिती आणि हतबलता पाहून अत्याचाराचे प्रकार घडून येतात. सरकारने कायदे कडक करावेतच. परंतु आज सातत्याने मोठ्या प्रमाणावर महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेची, जनजागृतीची मोहीम राबवण्याची आवश्यकता आहे. अगदी केवळ या व्यवस्थेसाठी महिलांचे फिरते पोलीस पथक निर्माण झाले पाहिजे. आणि ते २४ बाय ७ गावाच्या किंवा शहराच्या विविध भागांमध्ये गस्त घालीत राहिले पाहिजे. अशा उपायांमधून अत्याचार करणाऱ्या विकृतांवर सतत नजर राहू शकेल. आणि अशा नराधमांवर त्याचा काही प्रमाणात धाकही निर्माण होऊ शकेल. सध्याच्या या प्रकारांचे गांभीर्य लक्षात घेतले तर एकूण महिलांच्या संरक्षणासाठी पोलिसांची गस्त कमी पडते आहे. यासाठीच अधिक वेळ देणारी अधिक कार्यक्षम महिला अत्याचारविरोधी पोलीस यंत्रणा ही अनिवार्यता झालेली आहे.


## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

गर्वामुळे ज्ञानाचा, स्तुतीमुळे बुद्धीचा आणि स्वार्थामुळे प्रतिष्ठेचा नाश होतो.

## पंचांग

सोमवार, ४ मे २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर



* वैशाख कृष्ण तृतीया
* नक्षत्र : अनुराधा

रवी उदय- ०६-११
रवी अस्त- १९-०१

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृश्चिक

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### सुरण-मटार क्रिमी भाजी

**साहित्य :** ४-५ जणांसाठी, १५० ग्रॅम सुरणाचे काप, ६० ग्रॅम ताजे मटार, २-३ टेबलस्पुन जाडसर पेस्ट (मिरच्या आले लसुण, जिरे, कोथिंबीर), १-२ टिस्पुन साखर, २-३ टेबलस्पुन क्रिम, चवीनुसार मीठ, १ टिस्पुन लिंबाचा रस, ४-५ कडिपत्याची पाने, १ टिस्पुन मोहरी, १ टिस्पुन जिरे, १ पिंच हिंग


**कृती-** सुरण स्वच्छ धुवून त्याचे लहान तुकडे करून घ्या. मिठाच्या पाण्यात उकडून घ्या. तसेच मटार ही उकडून घ्या. दोन्ही पदार्थ चाळणीत काढून १-२ तास पाणी निथळुन कोरडे करून ठेवा. मिक्सर जारमध्ये आले, लसुण, मिरच्या, कोथिंबीर, जीरे ह्यांची जाडसर पेस्ट करून ठेवा.

कढईत कमी तेलात सुरणाचे काप व नंतर मटार शॅलो फ्राय करा. प्लेटमध्ये सुरणाचे काप व मटार काढून ठेवा. नंतर त्याच कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग, कडिपत्ता परतून त्यात तयार केलेली पेस्ट



टाकुन परतून घ्या. नंतर त्यात सुरणाचे काप व मटार मीठ साखर टाकुन चांगले परतून घ्या. नंतर त्यात आवडीप्रमाणे क्रिम मिक्स करून परता. २ मिनिटे झाकण ठेवुन शिजवा. आपली सुरण-मटार क्रिमी भाजी खाण्यासाठी तयार.

गरमागरम सुरण-मटार टेस्टी क्रिमी भाजी डिशमध्ये सर्व्ह करा. सोबत गरमागरम पोळ्या, भाकरी, रोटी, नान देता येतील.




# मुंबई आणि लखनौ संघांत आज लढत

## प्लेऑफचे आव्हान कायमचे संपुष्टात येणार

**मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या ४७ व्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात महत्त्वपूर्ण लढत होईल. दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर पडले आहेत. सूर्यकुमार यादव, हार्दिक पंड्या आणि पंत यांच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल. हार्दिक आणि सूर्यकुमारच्या निराशाजनक कामगिरीमुळे मुंबईची परिस्थिती बिकट झाली आहे.**



■ मुंबई

**मुंबईचा** सलामीवीर रोहित शर्मा हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे खेळू शकत नसल्याने तो आता बरा होण्याच्या मार्गावर आहे. पाच वेळचे चॅम्पियन मुंबई दोन विजयांसह गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. त्यासोबत लखनौ ४ गुणांसह दहाव्या स्थानावर आहे. पुढील फेरीत जाण्याची आशा कायम ठेवण्यासाठी मुंबई आणि लखनौला आपले सर्व सामने जिंकावे लागतील. इतर संघांचे निकालही त्यांच्यासाठी अनुकूल असावेत, अशी प्रार्थना मुंबई आणि लखनौच्या संघाने केली पाहिजे. मुंबईच्या खराब कामगिरीमुळे हार्दिकच्या कर्णधारपदावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रणनीतीच्या बाबतीत तो पूर्णपणे अपयशी ठरला आहे. मुंबईचे फलंदाज एकजुटीने कामगिरी करण्यात अपयशी ठरले आहेत. हार्दिकची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमधील कामगिरी साधारणच राहिली आहे.

हार्दिकच्या गोलंदाजीतील कामगिरी चढ-उतार असलेली आहे, पण त्याच्या फलंदाजीत लक्षणीय सुधारणेची गरज आहे. सूर्यकुमार चांगल्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयशी ठरला आहे. ही मुंबईसाठी चिंतेची बाब आहे, लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार पंतची कामगिरीही चांगली होत नाहीये. त्याच्या संघाने सलग पाच सामने गमावले असून, हा संघ गुणतालिकेत तळावर आहे. त्याच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. परंतु फलंदाजीतील कमकुवतपणा त्यांच्या विजयासाठी अडथळा ठरत आहे.

मागील सामन्यात मोहसिन खानने पाच बळी घेतले. परंतु त्याच्या या शानदार कामगिरीमुळे संघाला विजय मिळवता आला नाही. सुपर ओव्हरमध्ये खराब फॉर्ममध्ये असलेल्या पूरनला फलंदाजीसाठी पाठवण्याचा निर्णय चुकीचा ठरला. पंत स्वतः अशा टप्प्यावर आहे जिथे त्याच्या मर्यादित षटकांच्या खेळावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. बडोनी, मार्करम आणि मार्श यांनी अधूनमधून चांगली कामगिरी केली आहे.

## एकनाथ शिंदे क्रिकेट संघाने सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले

■ ठाणे



**ठाणे** येथील सेंट्रल मैदानावर स्पोर्टिंग क्लब कमिटीच्या वतीने आयोजित ३९ व्या डॉ. श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबने इंदप अकॅडमी क्रिकेट संघाचा ७ गडी राखून दणदणीत पराभव करत सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावत हॅट्ट्रिक नोंदवली.

नाणेफेक जिंकून एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. इंदप अकॅडमी संघाने २० षटकांत ५ गडी गमावत १४६ धावा केल्या. या डावात विकी पाटीलने ५९ चेंडूंत ७५ धावा करत महत्त्वपूर्ण खेळी साकारली, तर रहाटेने ३९ चेंडूंत ४१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. एकनाथ शिंदे क्लबकडून सिध्दांत सिंग (४-०-१८-३), हेमंत बुचडे (४-०-१५-१) आणि अमित पांडे (४-०-२६-१) यांनी प्रभावी गोलंदाजी करत प्रतिस्पर्ध्यांना मर्यादित धावसंख्येवर रोखले.

## महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी मोहोळांची बिनविरोध निवड

■ पुणे



**महाराष्ट्र** ऑलिम्पिक असोसिएशनच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर अखेर केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. माजी अध्यक्ष अजित पवार यांच्या निधनानंतर हे पद रिक्त झाले होते. या निवडीमागे गेल्या वर्षी घडलेल्या राजकीय घडामोडींची मोठी पार्श्वभूमी आहे. अध्यक्षपदासाठी मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवार यांच्या विरोधात उभे राहण्याचे संकेत दिले होते. मात्र ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार अध्यक्षपदी कायम राहिले, तर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी निवड झाली होती.

## बंड्या मारूती मंडळाच्या कबड्डी स्पर्धेत नौदलाने चषक पटकाविला

■ मुंबई




**भारतीय** नौदलाने बंड्या मारूती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. नौदलाचा भरत हुडा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला एक लाख रुपये देऊन गौरविण्यात आले. बंड्या मारूती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेचे सह-प्रायोजक होते लाईफ इन्शुरन्स ऑफ इंडिया, तर ऑफिशियल पार्टनर होते बँक ऑफ इंडिया. मुंबईतील ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅटवर झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय नौदलाने यु. पी. योद्धाचा प्रतिकार ४६-२७ असा सहज मोडून काढत रोख ५ लाख आणि चषक आपल्या नावे केला. उपविजेत्या यु. पी. ला चषक व रोख ३ लाखांवर समाधान मानावे लागले. दोन्ही संघांनी सावध सुरुवात केली. त्यामुळे पहिली चार-पाच मिनिटे सावध खेळ केल्यानंतर नौदलाने आपला खेळ गतिमान करीत पहिला लोण देत १६-१० अशी आघाडी घेतली. लोण घेतल्यानंतर योद्धाच्या गगन गौडाने तुफानी चढाई करीत ३ गडी टिपत सामन्यात चुरस निर्माण केली. पण नौदलाने पूर्वार्धात आणखी एक लोण देत आणला. विश्रांतीला २७-१८ अशी आघाडी नौदलाकडे होती. उत्तरार्धात शिलकी गड्याची पकड करीत दुसरा लोण देत आपली आघाडी ३०-१८ अशी केली.

## आर्यसेना, श्री समर्थ आणि ओम साईश्वरची विजयी घोडदौड

■ मुंबई

**मुंबईत** ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरच्या मैदानावर सुरू असलेल्या किशोर-किशोरी (सब ज्युनिअर) मुंबई जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा २०२६-२७ मध्ये आज किशोरी गटात लढती रंगल्या. महाराष्ट्र ॲमेच्युअर स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित या स्पर्धेत ओम साईश्वर सेवा मंडळ, श्री समर्थ व्या. मंदिर (अ) आणि आर्यसेना यांनी दमदार विजय मिळवत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली.

आर्यसेना विरुद्ध सरस्वती मंदिर हायस्कूल या सामन्यात नाणेफेक आर्यसेनाने जिंकून संरक्षण स्वीकारले आणि सामना ८-६ (२-२, २-२, ४-२) असा बरोबरीत सुटल्याने जादा डावात ५० सेकंद राखून २ गुणांनी विजय मिळवला. आर्यसेनाच्या सौम्या मोरे (४, २, २.४० मि. संरक्षण व १ गुण), दक्षता घोलप, गौरी मोरे (२ गुण) यांनी सलग दमदार कामगिरी केली. सरस्वतीकडून आरोही खरंगटे (३.१०, १.४०, २.४० मि. संरक्षण), प्रतीक्षा मोरे (२.३०, २.२० मि. संरक्षण व १ गुण), गौरी कांबळे (नाबाद १.२०, नाबाद ३, २.४० मि. संरक्षण व १ गुण), स्वरा लाड (३ गुण) यांनी झुंजार खेळ करत सामना रंगतदार केला.

## ठाणे वॉरियर्सची विजयी सलामी रुद्र धांडेचे झंझावती शतक

■ ठाणे

**रुद्र** धांडेची शतकी खेळी आणि अर्पण दासच्या प्रभावी गोलंदाजीमुळे ठाणे वॉरियर्स क्रिकेट अकॅडमी संघाने बेनेटन क्रिकेट क्लबचा ८१ धावांनी दणदणीत पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्थेने युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आयोजित १४ व्या उपमुख्यमंत्री चषक ठाणे प्रीमियर लीगमध्ये विजयी सुरुवात केली. २२४ धावांच्या आव्हानाला सामोरे जाताना बेनेटन क्रिकेट क्लबचा डाव १४३ धावांवर आटोपला. रुद्रला सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला.



प्रथम फलंदाजी करताना रुद्रने आक्रमक खेळी करत संघांच्या विजयाचा पाया रचला. रुद्रने ५५ चेंडूंत चौदा चौकार आणि पाच षटकार ठोकत ११२ धावांच्या खेळीसह स्पर्धेतील दुसऱ्या शतकाची नोंद केली. दिशांत शहाने ४१ आणि अनिरुद्ध नायरने २५ धावा बनवल्या.

## सांघिक कॅरम स्पर्धेत अपना बँकेचा संघ अजिंक्य


■ मुंबई

**लाईफ** इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी आनंदराव अडसूळ ट्रस्ट ट्रॉफी आंतर सहकारी बँक सांघिक कॅरम स्पर्धेत अपना सहकारी बँकेने अजिंक्यपद पटकाविले. गीतेश कोरगावकर व प्रियेश पाठक यांच्या विजयी खेळामुळे अपना बँकेने म्युनिसिपल बँकेचा २-१ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. अंतिम उपविजेत्या म्युनिसिपल बँकेला राहुल पडेलकरने एकमात्र विजय मिळवून दिला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ, युनियनचे सरचिटणीस नरेंद्र सावंत, खजिनदार प्रमोद पार्टे, सहखजिनदार जनार्दन मोरे, एलआयसी प्रतिनिधी दीपाली घुर्ये, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन-मुंबई व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त आयोजित सांघिक कॅरम स्पर्धेमधील तृतीय क्रमांकाच्या सामन्यात एनकेजीएसबी बँकेने कोकण बँकेचा २-१ असा पराभव करताना गणेश शानबाग व प्रथमेश पवार यांनी विजयी खेळ केला.

# सुख शांती समाधान



## कालाष्टमीच्या दिवशी करा हे उपाय

सनातन धर्मामध्ये प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला कालाष्टमीचे व्रत पाळले जाते. या दिवशी भगवान शंकराचे उग्र रूप असलेल्या काळभैरवाची पूजा केली जाते. मान्यतेनुसार, या दिवशी कालभैरवाची पूजा केल्याने व्यक्तीच्या जीवनातील सर्व समस्या दूर होण्यास मदत होते. तसेच या दिवशी काही उपाय केल्यास त्या व्यक्तीला त्याचा फायदा होतो.

जर व्यक्तीच्या जीवनात सुख-सुविधांमध्ये वाढ होत नसेल तर त्यांनी कालाष्टमीच्या दिवशी मातीच्या दिव्यात मोहरीच्या तेलाचा दिवा लावा. हा दिवा लावताना 'ओम ह्रीम बटुकाय अपदुद्धरणाय कुरु कुरु बटुकाय ह्रीम ओम' या मंत्रांचा जप करावा.

जर घरामध्ये शांतीचे वातावरण राहत नसेल. वारंवार भांडण होत असतील किंवा इतर समस्या उद्भवत असतील तर कालाष्टमीच्या दिवशी महादेवाच्या मूर्तीसमोर बसून शिव चालिसाचे पठण करावे. असे केल्याने कुटुंबामध्ये आनंदाचे वातावरण राहील. त्यासोबतच शिवाचे उग्र रूप शांत होऊन ते प्रसन्न होतील आणि तुम्हाला आशीर्वाद मिळेल.

## अंगारकी चतुर्थीला करा हे उपाय...

**हिंदू धर्मात अंगारकी चतुर्थीला खास महत्त्व आहे. हे व्रत रिद्धी आणि सिद्धी देणारा भगवान गणेशाला समर्पित आहे. माघ महिन्यात येत असल्याने त्याचे महत्त्व आणखी वाढते. हे व्रत संकटांपासून मुक्तता, आर्थिक स्थिरता आणि मुलांच्या दीर्घायुष्यासाठी पाळला जातो. या दिवशी काही खास उपाय करणे शुभ मानले जाते. ज्योतिषशास्त्रानुसार अंगारकी चतुर्थीला काही विशेष उपाय केल्याने संपत्ती वाढते आणि समस्यांपासून मुक्तता मिळते. प्रत्येक मराठी महिन्याच्या वद्य चतुर्थीला उपवास करून गणेशाची आराधना करण्याची परंपरा आदिकालापासून सुरू आहे. गणेश व्रतांमध्ये संकष्ट चतुर्थीचे व्रत सर्वोच्च आणि सर्वश्रेष्ठ मानले जाते. हे व्रत आचरल्यामुळे विघ्नहर्ता बाप्पा लवकर शुभफल देतो, अशी मान्यता आहे.**

संकष्ट चतुर्थीला अंगारक योग विशेष का मानला जातो? अंगारकी संकष्टी चतुर्थी हा योग वारंवार येत नाही. मंगळवारी चतुर्थी आली की, अंगारक योग जुळून येतो. अंगारक म्हणजे मंगळ ग्रह, जो निखाऱ्यासारखा लालभडक दिसतो. त्याने भारद्वाज ऋषींकडून गणेशमंत्र घेतला आणि गणरायाची उपासना केली. त्याच्या उपासनेवर प्रसन्न होऊन बाप्पाने त्याला आशीर्वाद दिला की, 'माझ्या जन्माची तिथी चतुर्थी होती, म्हणून मंगळवारी येणारी चतुर्थी तुझ्या नावाने अर्थात अंगारकी चतुर्थी म्हणून ओळखली जाईल! मुद्गल पुराणात तसेच गणेश पुराणात याचे संदर्भ आढळून येतात. अमंगळ समजल्या जाणाऱ्या मंगळ ग्रहाला ज्या वरदविनायकाने पावन केले त्या विनायकाने आपलाही उद्धार करावा या हेतूने अंगारकी चतुर्थीचे व्रत केले जाते.

गणेश भक्तांसाठी महत्त्वाची असणारी अंगारकी चतुर्थी मंगळवारी आहे. अंगारकी संकष्टी चतुर्थी दिवशी गणपतीची आराधना आणि व्रत केल्यास वर्षभरातील संकष्टीचे पुण्य मिळते अशी भावना आहे.

संकष्टीचा अर्थ दुःखाचा पराभव करणारा असा होतो. भाविकही अगदी भक्तीभावाने गणेशाची पूजा करून, त्याच्यासाठी उपवास धरून हे व्रत करतात. संकष्टी चतुर्थी हा दिवस सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाला समर्पित करण्यात येतो. या दिवशी गणपतीची पूजा केली जाते. यामुळे घरात प्रसन्न वातावरण बनतं. हिंदू कॅलेंडरनुसार, २०२६ मधील ही दुसरी अंगारकी चतुर्थी तिथी ५ मे २०२६ रोजी आहे.




चतुर्थीला काळे कपडे घालणे टाळावे. हिंदू धर्मात, कोणत्याही व्रत किंवा शुभ प्रसंगी काळे कपडे घालणे निषिद्ध मानले जाते.

चतुर्थीच्या दिवशी चंद्राची पूजा करण्याची परंपरा आहे. तांदूळ, पाणी, दूध, लाल चंदन, फुले, कुश गवत आणि संपूर्ण धान्य मिसळा. एकत्र करून चंद्र देवाला अर्घ्य द्यावे. हे अर्घ्य पाणी तुमच्या पायावर पडू नये तसेच पायाखाली येऊ नये याची काळजी घ्या. या उपायाने कुटुंबात शांती आणि आनंद येतो.

याव्यतिरिक्त चतुर्थीच्या पूजेत तुळशीची पाने वापरू नयेत. धार्मिक श्रद्धेनुसार, दुर्वा भगवान गणेशाला अर्पण करावे.

चतुर्थीला गणपतीसमोर दोन सुपारी आणि दोन वेलची ठेवा आणि योग्य विधींनी त्यांची पूजा करा. असे मानले जाते की या प्रथेमुळे गणेशाचे आशीर्वाद मिळतात आणि रखडलेली कामे पूर्ण होतात.

चतुर्थीला पूजा करताना, लाल कापड पसरा आणि त्यावर श्रीयंत्र ठेवा. नंतर, मध्यभागी एक सुपारी ठेवा. पूजा झाल्यानंतर, श्रीयंत्र आणि सुपारी तुमच्या तिजोरीत ठेवा. असे केल्याने तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होते.

श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून सूर्याला जल अर्पण करावे.

यानंतर घरातील मंदिरातील गणेश मूर्ती गंगाजल आणि मधाने स्वच्छ करावी.

सिंदूर, दुर्वा, फुले, तांदूळ, फळे, जान्हवं, पानात सुपारी, लवंग, इलायची आणि एखादी मिठाई ठेवा. यानंतर नारळ आणि प्रसादात मोदक इत्यादी वस्तू पूजेसाठी गोळा कराव्या.

'ॐ गं गणपते नमः या मंत्राचा जप करून पूजा करावी. मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

श्रीगणेशासमोर व्रत करून दिवसभर अन्न न खाण्याचे संकल्प घ्यावे.

उपवासात फळे, पाणी, दूध, फळांचा रस इत्यादींचे सेवन करता येते.

सर्वप्रथम तुपाचा दिवा लावावा. त्यानंतर पूजेचे संकल्प घ्यावे.

त्यानंतर गणेशाचे ध्यान करून त्यांचे आवाहन करावे.

यानंतर गणेशाला स्नान घालावे.

प्रथम पाण्याने नंतर पंचामृत (दूध, दही, तूप, मध आणि साखर यांचे मिश्रण) आणि पुन्हा शुद्ध पाण्याने स्नान घालावे.



गणेशाचे मंत्र आणि चालिसा, स्तोत्र इत्यादी पठण करावे.

आता गणेशाला वस्त्र अर्पण करावे. जर वस्त्र नसतील तर तुम्ही त्यांना नाडा देखील अर्पण करू शकता.

यानंतर गणपतीच्या मूर्तीवर सिंदूर, चंदन, फुले आणि फुलांच्या माळा अर्पण कराव्या.

आता बाप्पाला एक सुंदर सुगंधी उदबत्ती दाखवा.

आता दुसरा दिवा लावावा आणि नैवेद्य दाखवावा. नैवेद्यात मोदक, मिठाई, गूळ आणि फळे यांचा समावेश असावा.

गणपतीला दक्षिणा अर्पण करून २१ मोदकांचा नैवेद्य दाखवावा. सर्व सामग्री अर्पण केल्यानंतर धूप, दिवा आणि उदबत्ती दाखवावी.

गणपतीची आरती करावी. गणेशाची आरती कापूरासह तुपात बुडवून एक किंवा तीन किंवा अधिक वाती बनवून केली जाते.

यानंतर हातात फुले घेऊन गणपतीच्या चरणी पुष्प अर्पण करावे.

आता गणपतीला प्रदक्षिणा घालावी. गणपतीला प्रदक्षिणा एकदाच केली जाते हे लक्षात ठेवा.

यानंतर गणपतीकडे काही चूक झाली असल्यास माफी मागावी.

पूजेच्या शेवटी साष्टांग नमस्कार करावा.

पूजेनंतर गरजू लोकांना पैसे आणि धान्य दान करा.

गाईला रोटी किंवा हिरवे गवत द्यावे. तुम्ही कोणत्याही गोठ्यात पैसे दान करू शकता. रात्री चंद्र पाहून पूजा करून हे व्रत मोडावे.

संध्याकाळी, चंद्र बाहेर येण्यापूर्वी, पुन्हा एकदा गणपतीची पूजा करा आणि संकष्टी व्रत कथा पाठ करा. नंतर उपवास सोडावा.

ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम्। ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीदसादनम्।।

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

---

## मोहोळ-वळसंग महामार्गावरून भाजपा-काँग्रेसमध्ये श्रेयवाद

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील मोहोळ-तेरामैल-वळसंग या महत्त्वाच्या रस्त्यासाठी तब्बल ७४० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्यानंतर आता भाजपा आणि काँग्रेस यांच्यात श्रेयवाद रंगला आहे. मोहोळ ते वळसंग दरम्यान सुमारे ८२ किलोमीटर लांबीच्या या महामार्गाच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून निधी मंजूर करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या निधीला हिरवा कंदील दिल्याचे सांगितले जात आहे. या मंजुरीनंतर काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे आणि भाजपाचे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्यात श्रेय घेण्याची स्पर्धा लागली आहे. दोन्ही नेत्यांनी या प्रकल्पाबाबतचे आदेश आणि पत्रव्यवहार शेअर करत आपापल्या पक्षाचे योगदान सांगितले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा रस्ता सध्या राजकीय वादात सापडला आहे.

## झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालयाच्या इमारतीचा पाया कमकुवत

**मुंबई-** वांद्र्यातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) कार्यालयाच्या इमारतीचा पाया मजबूत नाही, असे कारण देत शासनाने या इमारतीच्या वर अतिरिक्त मजले बांधण्यास नकार दिला आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. झोपू कार्यालयाची पाच मजली इमारत २००७-०८ या दरम्यान बांधण्यात आली आहे. या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची वाढती संख्या पाहता कामकाजासाठी कार्यालयाची जागा अपुरी पडू लागली होती. यासाठी झोपूच्या इमारतीवर तीन ते चार अतिरिक्त मजले बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राधिकरणाने मंजुरीसाठी पाठवला होता, असे सांगून अधिकारी म्हणाला, या पाच मजली इमारतीच्या बांधकामाचा पाया याच्या वजनानुसार आहे. त्यामुळे अतिरिक्त मजल्याचा भार सांभाळण्याची क्षमता नसल्याचे दिसून येते. या कारणामुळे इमारतीवर नवीन बांधकाम करता येणे शक्य नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.


### जाहीर सूचना

संबंधितांना याद्वारे सूचना देण्यात येते की, मे. आर.पी. असोसिएट्स त्यांच्या श्री. हरेश्वर पी. राऊत यांच्या द्वारे आणि श्री. रॉक गॅब्रियल रॉड्रीग्ज यांच्या दरम्यानचे, नोंदणी क्र. पी१५३३/१९९२, दिनांक २८.०८.१९९२ धारण केलेले उप निबंधक वसई-२ यांच्याकडे योग्यरित्या नोंदणीकृत असलेले मूळ विक्री करारपत्र आणि श्री. रॉक गॅब्रियल रॉड्रीग्ज (हस्तांतरणकर्ता) आणि श्री. पीटर व्हिक्टर मिरांडा (हस्तांतरण प्राप्तकर्ता) यांच्या दरम्यानचे नोंदणी क्र. २१६२/२००२, दिनांक १०.०४.२००२ धारण केलेले, उप निबंधक वसई-२ कडे योग्यरित्या नोंदणीकृत मूळ पुनर्विक्रीकरिता करारपत्र, दोन्ही करारपत्रे, महसूल गाव आगाशी, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे वसलेल्या असलेल्या आणि स्थित, सर्व्हे क्र. २७६ - ए, हिस्सा क्र. ७, ८, ९, १०/१, १०/२१०/३११, १२/१ आणि १७ धारण केलेल्या अ-कृषिक जमिनीवर बांधलेल्या "गोपाल गणेश नगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि." या संस्थेच्या आणि "गोपाल गणेश नगर" या इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान क्र. ५३७ए/२९, मोजमाप ३०५ चौरस फूट म्हणजेच २८.३४५ चौरस मीटर्स (बिल्ट अप क्षेत्रफळ) च्या संदर्भात असून ती हरवली आहेत, म्हणून, जर कोणा व्यक्तीचा उपरोल्लेखित युनिटविरुद्ध कोणताही हक्क, शीर्षक, दावा आणि हितसंबंध असल्यास, त्याने सदर जाहीर सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत ॲड. विलास विनोद गोटमारे, ॲडव्होकेट उच्च न्यायालय, दुकान क्र. २१९, २रा मजला, पद्मिबाई टॉवर, रेल्वे सबवेसमोर, एम. पी. रोड, विरार पूर्व, ता. वसई, जिल्हा पालघर ४०१३०५ यांच्या कार्यालयामध्ये आक्षेप घ्यावा.

सही/-
ॲड. विलास विनोद गोटमारे
ठिकाण: विरार दिनांक: ०४.०५.२०२६

### ज्याच्याशी संबंधित असेल त्यांच्याकरिता

मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील गाव पोयसर, तालुका बोरीवली येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या जमीन आणि मैदानावर बांधलेल्या, ठाकुर व्हिलेज, कांदिवली, पूर्व, मुंबई ४००१०१ येथे स्थित **एन. जी. सनसिटी फेज I सी.एच.एस. लि. ("संस्था")** चे सदस्य आणि **सदनिका क्र. ४०२, विंग बी, इमारत क्र. १, एन. जी. सनसिटी फेज I सी.एच.एस. लि., ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१ ("जागा")** चे धारणकर्ते **श्री. सुभाषचंद्रा पी. पारीक ("दिवंगत")** यांचे **कोणतेही नामनिर्देशन न करता दि. ०६.०७.२०१० रोजी मुंबई येथे निधन झाले.** संस्थेने प्रक्रियेचे पालन करून संस्थेची सदस्यता नामनिर्देशित व्यक्ती सौ. संत्रा सुभाष पारीक यांच्या नावे योग्यरित्या हस्तांतरित केली, तथापि, सदर सौ. संत्रा सुभाष पारीक यांचे दि. २७.१०.२०१५ रोजी निधन झाले. अन्य कायदेशीर वारस म्हणजेच सौ. सानू पारीक हक्कसोड करारनाम्याद्वारे त्यांचे सदर **जागा** आणि संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील तिचा हक्क आणि हितसंबंध **श्री. सिद्धार्थ पारीक** यांच्या नावे सोडण्यास आणि त्याग करण्यास इच्छुक आहे.

मी याद्वारे दिवंगत सुभाषचंद्रा पी. पारीक / दिवंगत संत्रा सुभाष पारीक यांचे सदर जागा आणि संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील हिस्सा आणि हितसंबंध श्री. सिद्धार्थ पारीक यांच्या नावे हस्तांतरित करण्यास सदर सूचना प्रसिद्धीपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत दावे किंवा आक्षेप, सदर जागा आणि संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत व्यक्तीचा हिस्सा आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास असलेल्या त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/आक्षेपांच्या समर्थनार्थ अशा दस्तऐवज आणि इतर पुराव्यांच्या प्रतिंसह, आमंत्रित करीत आहे. जर वरील विहीत कालावधीमध्ये कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, अशा दावे/आक्षेपांच्या संदर्भाशिवाय दावा नसल्याचे आवश्यक पत्र मी पारित करेन आणि दावे/आक्षेप, जर असल्यास, सोडून दिले आणि कशाही प्रकारे बंधनकारक नसल्याचे समजण्यात येईल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या हिस्सा आणि हितसंबंधांसह संस्थेच्या उप-विधीअंतर्गत दिलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास संस्था मुक्त असेल.

**अनिल डी. पांडेय - ॲडव्होकेट**
कामधेनू असोसिएट्स - ॲडव्होकेट्स आणि कायदेशीर सल्लागार
सदनिका क्र. सी-१०३, पहिला मजला, गोकुळ हॉरिझन,
गुंदेचा'ज ट्रिलियमसमोर, ठाकुर गाव, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

### पावरग्रिड POWERGRID

#### सूचना

१. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ सह कलम ७९ (१) (डी) अन्वये, तसेच केंद्रीय विद्युत नियामक आयोग (व्यवसाय संचालन) विनियम, २०२३ च्या विनियम १५ (१) (ए) आणि विनियम २३ सह केंद्रीय विद्युत नियामक आयोग (शुल्काचे नियम व अटी) विनियम, २०२४ अन्वये; पश्चिम विभागातील "गुजरात येथील ४००/२२० केव्ही भचाऊ उपकेंद्राची परिवर्तन क्षमता ४००/२२० केव्ही, १×५०० एमव्हीए आयसीटी (३री) द्वारे वाढवणे" या प्रकल्पांतर्गत, भचाऊ उपकेंद्रातील (एस/एस) १×५०० एमव्हीए, ४००/२२० केव्ही आयसीटी (३री) आणि त्याच्याशी संबंधित बेजसाठी, डीओसीओकडून दि. ३१.०३.२०२९ पर्यंतचे दर निश्चित करण्याबाबतची याचिका.
उपरोल्लेखित प्रेषण प्रणालीचे लाभार्थी: (१) एमपीपीएमसीएल, जबलपूर, (२) एमएसईडीसीएल, मुंबई, (३) जीयूव्हीएनएल, वडोदरा, (४) विद्युत विभाग, गोवा सरकार, पणजी, (५)डीएनएचडीडीपीसीएल, सिल्वासा, (६) सीएसपीडीसीएल, रायपूर, (७) सीटीयूआयएल.

२. दर तपशील:
प्रकल्पाची एससीओडी: २५.०४.२०२५
प्रकल्पाकरिता एफआर मंजूर किंमत: ₹ ४०५१.०० लाख
अंदाजे पूर्तता किमत: ₹ ४५८२.२३ लाख

२०२४-२९ दर ब्लॉक करिता प्रेषण दर (₹ लाखात)

| मालमत्ता क्र. | मालमत्तेचे नाव आणि तिचे ठिकाण | सीओडी | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मालमत्ता १: भचाऊ एस/एस व त्यासह त्याच्याशी संबंधित बेज येथे १×५०० एमव्हीए, ४००/२२० केव्ही आयसीटी (३री) | २७.०१.२०२६ | उपलब्ध नाही | १२०.३१ | ८२६.८५ | ८८१.४८ | ८७९.३६ |

३. दर निश्चितीकरिता केलेल्या अर्जाची प्रत अर्जदाराच्या वेबसाईट www.powergrid.in वर पोस्ट करण्यात आली आहे.

४. अर्जामध्ये समाविष्ट दर निश्चितीकरिता प्रस्तावावर सूचना आणि आक्षेप, जर असल्यास, लाभार्थींसह कोणत्याही व्यक्तींनी सेक्रेटरी, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, ६ वा, ७ वा आणि ८ वा मजला, टॉवर बी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, नवरोजी नगर, नवी दिल्ली - ११००२९ (किंवा जेथे आयोगाचे कार्यालय स्थित असेल असा दुसरा पत्ता) यांच्याकडे दाखल करावा व त्याची प्रत अर्जदारास त्यांच्या कॉर्पोरेट कार्यालयात सदर सूचना प्रसिद्धीपासून ३० दिवसांच्या आत सादर करावी.

ठिकाण: गुरगाव सही/-
दिनांक: ०४.०५.२०२६ वरिष्ठ उप महाव्यवस्थापक (वाणिज्य)

पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
नोंद. कार्यालय: बी-९, कुताब इंस्टिट्यूशनल एरिया, कटवारिया सराई, नवी दिल्ली-११० ०१६.
कॉर्पो. कार्यालय: "सौदामिनी", प्लॉट क्र. २, सेक्टर-२९, गुरगाव-१२२००१ (हरयाणा)
www.powergrid.in, सीआयएन: L40101DL1989GOI038121
A Maharatna PSU

PG/CC/NIT-06/Ad-09/26-27 Paramin

### जाहीर सूचना

नादारी आणि दिवाळखोरी संहिता (आयबीसी) च्या कलम १३० च्या उप-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये

#### दिवाळखोरी प्रक्रियेचा प्रारंभ आणि दाव्यांकरिता निमंत्रण

येथे सूचना देण्यात येत आहे की, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (आयबीसी) च्या कलम १२६ च्या तरतुदींनुसार, माननीय एनसीएलटी यांनी सी.पी.(आयबी)३२१/(एमबी)२०२६ मध्ये दिनांक ०१.०४.२०२६ रोजी पारित केलेल्या दिवाळखोरी आदेशान्वये, श्री. प्रेमचंद मित्तल यांचा मुलगा श्री.विकास प्रेमचंद मित्तल यांच्यासाठी दिवाळखोरी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
संबंधित तपशिल

| | | |
|---|---|---|
| १. | दिवाळखोर व्यक्तीचे नाव: | बिकास प्रेमचंद मित्तल (पीव्हीएन फॅब्रिक्स प्रा. लि. यांच्या प्रकरणात वैयक्तिक जामीनदार) |
| २. | दिवाळखोर व्यक्तीचा पॅन क्रमांक: | BCKPM3725M |
| ३. | दिवाळखोर व्यक्तीचा आधार क्रमांक: | ९८७५५३२८८३२५ |
| ४. | दिवाळखोर व्यक्तीचा पत्ता: | बी-३०३, रॉयल ड्रीम्स, दमन रोड, वापी चाला, वलसाड-३९६१९१ |
| ५. | दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख: | २४ एप्रिल २०२६ (माननीय एनसीएलटी यांनी १ एप्रिल २०२६ रोजी दिलेला आदेश २४ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झाला) |
| ६. | दिवाळखोरी विश्वस्ताचे नाव आणि पत्ता: | निलेश राजेंद्र कोठारी<br>**आयबीबीआय नोंदणीकृत पत्ता:** ए७०३, इस्कॉन रिव्हरसाईड, शिलालेख सोसायटी जवळ, शाहीबाग, अहमदाबाद, गुजरात ३८०००४<br>पत्रव्यवहाराचा पत्ता: ट्रूव्हिसरी इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रा. लि., कार्यालय क्र. ४१०, चौथा मजला, ब्लू रोझ इंडस्ट्रियल इस्टेट, मागाठणे, बोरिवली पूर्व, मुंबई - ४०००६६ |
| ७. | दिवाळखोरी विश्वस्ताचा संपर्क तपशील: | **ईमेल:** bt.bikasmittal@gmail.com आणि ip.nkothari@gmail.com<br>दूरध्वनी : ९८५००३२२०७ |
| ८. | दावे सादर करण्याची अंतिम तारीख: | ११ मे २०२६ |

**दावे सादर करण्यासंबंधी सूचना:**
दिवाळखोर व्यक्तीच्या सर्व धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी आपले दावे पुराव्यासह ११ मे २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, वर नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर दिवाळखोरी विश्वस्तांकडे सादर करावेत.
**दाव्यांच्या पुराव्यांचे सादरीकरण:**
आयबीबीआय (कॉर्पोरेट कर्जदारांच्या वैयक्तिक जामीनदारांसाठी दिवाळखोरी प्रक्रिया) विनियम, २०१९ नुसार दाव्यांचे पुरावे विनिर्दिष्ट नमुन्यांमध्ये सादर करायचे आहेत. हे नमुने www.ibbi.gov.in या वेबसाइटवरून डाउनलोड करता येतील.
अधिक तपशील किंवा स्पष्टीकरणासाठी, आपण खालील व्यक्तीशी संपर्क साधू शकता.

**दिनांक:** ०४.०५.२०२६ सही/-
**ठिकाण:** मुंबई **निलेश राजेंद्र कोठारी**
**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPA-002/IP-N01225/2022-2023/14132
**एएफए क्र.:** एए२/१४१३२/०२/३००६२७/२०४२८६ **वैधता:** ३०.०६.२०२७ पर्यंत
**आयबीबीआय कडील पत्ता:** ए७०३, इस्कॉन रिव्हरसाईड, शिलालेख सोसायटी जवळ, शाहीबाग, अहमदाबाद, गुजरात, ३८०००४.
**पत्रव्यवहाराचा पत्ता:** ट्रूव्हिसरी इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रा. लि., कार्यालय क्र. ४१०, ४था मजला, ब्लू रोझ इंडस्ट्रियल इस्टेट, मागाठणे, बोरिवली पूर्व, मुंबई - ४०००६६

### जाहीर सूचना

येथे सूचित करण्यात येते की **१) श्री. क्षेमाल प्रमोद मनकोडी आणि २) सौ.मीशा क्षेमाल मनकोडी** यांनी खालील **'अनुसूची'** मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या फ्लॅट्स व टेरेसवरील त्यांचे सर्व हक्क, शिर्षक व हितसंबंध विक्री, हस्तांतरण व हस्तांतरित करण्यास तसेच कोणत्याही बोजामुक्त शांत, रिक्त व ताब्यातील मालमत्ता माझ्या अशिलांना सुपूर्द करण्यास, मालक व माझे अशिल यांच्यात परस्पर ठरलेल्या अटी व शर्तीनुसार सहमती दर्शविली आहे.

सर्व व्यक्तिस सदर फ्लॅट आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, वाटप, अदलाबदल, भेट, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, गहाण, प्रभार, धारणाधिकार, ट्रस्ट, बारसा, वसीयत, सुखसोयी, ताबा, देखभाल, विकास हक्क, कोणत्याही न्यायालयाचा डिक्री किंवा आदेश, करार किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, हितसंबंध, फायदा, दावा किंवा मागणी असल्यास त्यासंबंधीची माहिती लेखी स्वरूपात तसेच संबंधित सर्व कागदपत्रांच्या नोटरीद्वारे प्रमाणित प्रतींसह या सूचनेच्या प्रकाशन दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्ता **पारिकेत शाह**, वकील, उच्च न्यायालय, यांचे कार्यालय, **जी-१७, मोटलीबाई वाडिया बिल्डिंग, सय्यद अब्दुल्ला ब्रेलवी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४००००१** येथे कळवावे, अन्यथा, असे कोणतेही दावे असल्यास ते त्याग किंवा सोडून दिलेले समजले जातील आणि माझे अशिल सदर व्यवहार पुढे सुरू करतील. त्यानुसार, सदर मालमत्तेचा हक्क स्पष्ट, विक्रीयोग्य व कोणत्याही प्रकारच्या बोजामुक्त असल्याचे मानले जाईल.

**अनुसूची**

अ) प्रिमायसेस म्हणजे **फ्लॅट क्र.१**, सुमारे १०५० चौ. फूट बिल्ट-अप क्षेत्र किंवा जवळपास, **१ल्या मजल्यावर**, ए विंगमध्ये, **आराधना कोहौसोलि** च्या **'आराधना'** म्हणून ज्ञात इमारतीत, जे **विशाल हॉल समोर, सर एम. व्ही. रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९** येथील सर्व भाग व खंड, गाव गुंदावली, तालुका अंधेरी येथील सीटीएस क्र.४००ए असलेल्या जमिनीच्या भाग व खंडावर बांधकामित, जी मुंबई उपनगर नोंदणी जिल्हा व उप-जिल्ह्याच्या हद्दीत येते.

ब) प्रत्येकी **रु. ५०/-** किमतीचे पूर्ण भरणा केलेले **०५ (पाच) शेअर्स, विशिष्ट क्र.१ ते ५** (दोन्ही समाविष्ट) असे, एकूण रु. २५०/- मूल्याचे, **भाग प्रमाणपत्र क्र.०१**, दिनांक १६.१२.१९९६ अन्वये, आराधना को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. यांनी जारी केलेले.

क) प्रिमायसेस म्हणजे **फ्लॅट क्र.२**, सुमारे १०५८ चौ. फूट बिल्ट-अप क्षेत्र किंवा जवळपास, **२ ऱ्या मजल्यावर**, ए विंगमध्ये, **आराधना कोहौसोलि** च्या **'आराधना'** म्हणून ज्ञात इमारतीत यासह टेरेस मोजमाप सुमारे ६०० चौ. फूट किंवा जवळपास, **२ ऱ्या मजल्यावर**, बी विंगमध्ये, जे **विशाल हॉल समोर, सर एम. व्ही. रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९** येथील सर्व भाग व खंड, गाव गुंदावली, तालुका अंधेरी येथील सीटीएस क्र.४००ए असलेल्या जमिनीच्या भाग व खंडावर बांधकामित, जी मुंबई उपनगर नोंदणी जिल्हा व उप-जिल्ह्याच्या हद्दीत येते.

ड) प्रत्येकी **रु. ५०/-** किमतीचे पूर्ण भरणा केलेले **०५ (पाच) शेअर्स, विशिष्ट क्र.६ ते १०** (दोन्ही समाविष्ट) असे, एकूण रु. २५०/- मूल्याचे, **भाग प्रमाणपत्र क्र.०२**, दिनांक १६.१२.१९९६ अन्वये, आराधना को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. यांनी जारी केलेले.

**पारिकेत शाह**
**वकील, उच्च न्यायालय, मुंबई**
मोबाईल: +९१ ९९६९८८३६८९
pariketshah@outlook.com

**दिनांक: ०४.०५.२०२६**
**ठिकाण: मुंबई**

### फॉर्म जी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण

#### एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड
नवी दिल्ली, भारत येथे शिक्षण तंत्रज्ञान / डिजिटल शिक्षण क्षेत्रात कार्यरत (अखिल भारतीय स्तरावर कार्यरत)

*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए चे उप-विनियम (१) अन्वये)*

हे फॉर्म जी अधोस्वाक्षरीकर्ताद्वारे, माननीय एनसीएलटी, नवी दिल्ली खंडपीठ (न्यायालय-२) यांच्या दिनांक १३.०३.२०२६ च्या आदेशान्वये (फॉर्म जी च्या प्रकाशनाच्या टप्प्यापासून १०० दिवसांच्या कालावधीत सीआयआरपी पुन्हा सुरू करण्याच्या निर्देशानुसार), तसेच एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड (कॉर्पोरेट कर्जदार) च्या धनकोंची समिती (सीओसी) ने दिनांक २३.०४.२०२६ रोजी आयोजित केलेल्या आपल्या ३१ व्या सभेत (जी प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याच्या आदेशानंतरची पहिलीच सभा होती) दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने प्रकाशित केला जात आहे; यावरील मतदान दिनांक ३०.०४.२०२६ रोजी पूर्ण झाले.
एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड (कॉर्पोरेट कर्जदार) ची कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया (सीआयआरपी) ही, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (संहिता) च्या तरतुदींनुसार आणि सहवाचिता इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निवारण प्रक्रिया) विनियम, २०१६ (सीआयआरपी विनियम) अन्वये राबवली जात आहे. माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, नवी दिल्ली खंडपीठ (न्यायालय २) यांनी सीपी (आयबी) क्र. १०१ (पीबी)/२०१७ मधील आयए-१४८८/एनडी/२०२६ मध्ये, दिनांक ०८.०४.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, **श्री. कमल कुमार जाडवाणी** (आयबीबीआय नोंदणी क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०२७८६/२०२२-२०२३/१४२५९) यांची कॉर्पोरेट कर्जदार यांचे रिझोल्यूशन प्रोफेशनल (आरपी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
सीआयआरपी नियमावलीच्या नियम ३६ए अन्वये, अधोस्वाक्षरीकर्ता याद्वारे कॉर्पोरेट कर्जदारासाठी ठराव योजना सादर करण्याकरिता, पात्र संभाव्य ठराव अर्जदाराकडून स्वारस्य अभिव्यक्ती' (ईओआय) आमंत्रित करत आहे. संबंधित तपशील खाली नमूद केले आहेत:


| अ.क्र. | संबंधित तपशिल | वर्णन |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन / सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | **नाव : एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड**<br>**सीआयएन:** L74999DL1994PLC061353<br>**पॅन:** AAACE1713J |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | एल-३१४ (तळमजला व पहिला मजला), गल्ली क्र. ७, महिपालपूर, नवी दिल्ली - ११००३७<br>**कॉर्पोरेट कार्यालय:** ५१४ एज्युकॉम्प टॉवर, फेज ३, उद्योग विहार, गुरुग्राम, हरियाणा १२२०१६ |
| ३. | वेबसाइटची युआरएल | www.educomp.com |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | नवी दिल्ली येथील नोंदणीकृत कार्यालय आणि कॉर्पोरेट कार्यालय. प्रिमायसेस सर्व स्थिर मालमत्तेचे तपशील, निवडक संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती ज्ञापन /व्हर्च्युअल डेटा रूममध्ये उपलब्ध करून दिले जातील. |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कॉर्पोरेट कर्जदार शाळांना सर्वसमावेशक शैक्षणिक उपाययोजना पुरवण्याच्या व्यवसायात कार्यरत आहे; यामध्ये डिजिटल वर्गखोली/स्मार्ट क्लाससाठीचे साहित्य, के-१२ स्तरावरील डिजिटल शिक्षण उपाययोजना, शैक्षणिक मजकूर (व्हिडिओ, बहुपर्यायी प्रश्न, कार्यपत्रिका, प्रकल्प कार्य) आणि तत्सम संलग्न सेवांचा समावेश होतो. हा व्यवसाय सेवा आणि मजकुरावर आधारित असल्यामुळे, पारंपारिक उत्पादन क्षेत्राच्या संदर्भात वापरली जाणारी स्थापित क्षमता ही संकल्पना येथे लागू होत नाही. मजकूर भांडार, परवानाधारक वापरकर्त्यांचा आधार आणि सेवा पुरवण्याची क्षमता यांविषयीचा सविस्तर तपशील माहिती ज्ञापन मध्ये उपलब्ध करून दिला जाईल. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | कॉर्पोरेट कर्जदाराच्या उपलब्ध असलेल्या अद्ययावत आर्थिक विवरणपत्रांनुसार. तपशील 'माहिती ज्ञापनमध्ये' उपलब्ध करून दिले जातील. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | दिवाळखोरी प्रक्रिया सुरू झाल्याच्या दिनांकानुसार. कर्मचारी/कामगारांची अद्ययावत यादी माहिती ज्ञापनमध्ये उपलब्ध करून दिली जाईल. |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | www.educomp.com (संभाव्य ठराव अर्जदारांना गोपनीयतेच्या हमीपत्रावर स्वाक्षरी केल्यानंतर आणि तात्पुरत्या यादीत समावेशझाल्यावर व्हर्च्युअल डेटा रूममध्ये प्रवेश दिला जाईल) |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदाराची पात्रता येथे युआरएल वर उपलब्ध आहे: | www.educomp.com (आणि इच्छुक पक्षांनी cirp.educomp@awarensic.com या पत्त्यावर लेखी विनंती केल्यास, त्यांनाही ही माहिती कळवली जाईल.) |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | २५ मे २०२६ (१८०० भाप्रवे पर्यंत) |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | ०४ जून २०२६ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ०९ जून २०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | १४ जून २०२६ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | २० जून २०२६ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | २० जुलै २०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.educomp@awarensic.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | लागू नाही |

***टीप:*** *इच्छुक पक्ष हे पात्रता निकष, ईओआय सादर करण्याचे नमुने, गोपनीयता हमीपत्र आणि प्रक्रियेसंबंधी इतर कागदपत्रांचा समावेश असलेला सविस्तर स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण हा दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी, रिझोल्यूशन प्रोफेशनल यांना cirp.educomp@awarensic.com या पत्त्यावर लिहू शकतात. वर नमूद केलेल्या अंतिम दिनांक आणि वेळेनंतर प्राप्त झालेले ईओआय (अभिरुचीचे प्रस्ताव), किंवा विहित नमुन्यात नसलेले ईओआय, अथवा संहितेच्या कलम २९ए सहवाचिता कलम २५(२)(एच) आणि सीआयआरपी नियमावलीच्या नियम ३६ए(३) अन्वये निश्चित केलेले पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या व्यक्तींकडून आलेले ईओआय, हे नाकारले जाण्यास पात्र असतील. रिझोल्यूशन प्रोफेशनल यांनी धनको समितीच्या मान्यतेने, वरीलपैकी कोणत्याही तारखा/कालमर्यादा वाढविण्याचा अधिकार राखीव ठेवला आहे.*

दिनांक: ०४.०५.२०२६ सही/-
ठिकाण: नवी दिल्ली / मुंबई **सीए. कमल कुमार जाडवाणी**
**एज्युकॉम्प सोल्यूशन्स लिमिटेड** करिता रिझोल्यूशन प्रोफेशनल
**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPA-001/IP-P-02786/2022-2023/14259
**एएफए वैधता:** ३०.०६.२०२६ पर्यंत
**आयबीबीआय नोंदणीकृत पत्ता:** ऑफिस १०, सेंटर पॉइंट, १ ला मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१ इमारत, कफ परेड, मुंबई, महाराष्ट्र – ४००००५
**ई-मेल:** cirp.educomp@awarensic.com I **दूरध्वनी:** +९१-७०४५५ ९४०३९

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## 'गनमास्तर जी९'साठी मुंबईत इम्रानचा थरार




**अभिनेता** इम्रान हाश्मी आणि दिग्दर्शक आदित्य दत्त ही जोडी तब्बल २० वर्षांनंतर 'गनमास्तर जी९' या आगामी चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणाचे महत्त्वपूर्ण टप्पे सध्या पार पडत असून, मुंबईत एका भव्य कार ॲक्शन सीनचे चित्रीकरण होणार असल्याची माहिती दिग्दर्शक आदित्य दत्त यांनी दिली आहे. मुंबईतील रखरखत्या उन्हात सलग आठ दिवस या थरारक ॲक्शन दृश्याचे चित्रीकरण चालणार आहे.

मे महिन्यातील कडाक्याच्या उन्हात उघड्या मैदानात हे काम करणे आव्हानात्मक असले, तरी पावसाळा सुरू होण्यापूर्वी हे चित्रीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निर्मात्यांनी ठेवले आहे. मुंबईतील या शेड्युलनंतर चित्रपटाचा अखेरचा टप्पा जून महिन्यात उत्तराखंडमध्ये पार पडणार आहे.

ऋषिकेश, मसुरी आणि दिल्ली या ठिकाणी सुमारे २५ ते २६ दिवस चित्रीकरण केले जाईल. एकूणच या चित्रपटाचे ४० टक्के काम अद्याप शिल्लक आहे. 'आशिक बनाया आपने' या चित्रपटाच्या यशानंतर इम्रान हाश्मी, आदित्य दत्त आणि संगीतकार हिमेश रेशमिया हे त्रिकूट पुन्हा एकदा एकत्र आले आहे. त्यामुळे या चित्रपटाच्या संगीताकडूनही प्रेक्षकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत.

## 'पेड्डी'ची तारीख ठरली हो...!




**दाक्षिणात्य** सुपरस्टार राम चरण याच्या आगामी 'पेड्डी' या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असून, आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर झाली आहे. बुची बाबू सना यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला हा बहुचर्चित चित्रपट ४ जून २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

आयपीएलचा हंगाम संपल्यानंतर लगेचच हा चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे, जेणेकरून या भव्य चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर मोठी संधी मिळेल. या चित्रपटात राम चरणसोबत जान्हवी कपूर, जगपती बाबू आणि दाक्षिणात्य सुपरस्टार शिव राजकुमार यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'पेड्डी पैलवान' या झलकला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली असून, त्यातील राम चरणचा नवा अवतार विशेष चर्चेत राहिला आहे.

चित्रपटाच्या संगीताची धुरा ए. आर. रेहमान यांनी सांभाळली असून, 'चिकिरी चिकिरी' आणि 'राय राय रा रा' ही गाणी आधीच सोशल मीडियावर तुफान गाजली आहेत. 'वृद्धी सिनेमा' आणि 'मैत्री मुव्ही मेकर्स' यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून, २०२६ मधील हा सर्वात मोठा चित्रपट ठरेल, अशी चिन्हे दिसत आहेत.

## स्वरा भास्करचे चोख प्रत्युत्तर

**बाळंतपणानंतर** वाढलेल्या वजनावरून समाजमाध्यमांवर सातत्याने होणाऱ्या टीकेला अभिनेत्री स्वरा भास्करने कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. स्त्रियांच्या शरीराकडे केवळ लैंगिक दृष्टिकोनातून पाहण्याच्या मानसिकतेचा निषेध करत तिने मातृत्वाचा सन्मान राखण्याचे आवाहन केले आहे. स्वराने नुकताच तिचा २०१८ मधील एक जुना फोटो शेअर केला होता, ज्यावर काही नेटकऱ्यांनी तिच्या सध्याच्या रूपावरून आक्षेपार्ह टिप्पण्या केल्या. या टीकेला उत्तर देण्यासाठी तिने तो जुना फोटो आणि आपली अडीच वर्षांची मुलगी राबिया हिला कडेवर घेतलेला सध्याचा फोटो, असे कोलाज पोस्ट केले आहे. गेल्या काही वर्षांत बाळंतपणानंतर माझ्या शरीरात झालेल्या बदलांमुळे मला ज्या प्रकारचा राग आणि द्वेषाचा सामना करावा लागला आहे, तो अत्यंत अनाकलनीय आहे, अशा शब्दांत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या. इंटरनेटवरील अनोळखी व्यक्तींनी ठरवून दिलेल्या वेळेत वजन कमी करण्यास आपण नकार दिला असल्याचे स्वराने ठामपणे सांगितले. बाळ जन्माला आल्यानंतर पूर्ववत होण्याचा प्रयत्न मी जाणीवपूर्वक टाळला. एकदा तुम्ही पालक झालात की, तुमचे आयुष्य मूलभूतपणे बदलते आणि त्यात काहीही गैर नाही, असे तिने स्पष्ट केले. 'अभिनेत्री असूनही वजन का वाढवले?' असा प्रश्न विचारणाऱ्यांनाही स्वराने चोख उत्तर दिले आहे. तिने म्हटले की, अभिनय कौशल्य आणि शारीरिक वजन यांचा कोणताही संबंध नसतो. कलाकारांसाठी केवळ दिसायला देखणे असणे महत्त्वाचे नसून, त्यांची कला आणि क्षमता अधिक महत्त्वाची आहे. देशातील सर्वोत्तम अभिनेते हे नेहमीच पारंपारिक अर्थाने 'दिसण्यावर' अवलंबून नव्हते, याची आठवणही तिने करून दिली.



## 'तुंबाड'मध्ये आलियाची एंट्री




**'तुंबाड'** या गाजलेल्या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची सध्या सिनेवर्तुळात मोठी चर्चा असून, आता यात बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री आलिया भट्टची एन्ट्री होणार असल्याचे वृत्त आहे. सोहम शाह आणि नवाझुद्दीन सिद्दीकी यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'तुंबाड २' मध्ये आलिया भट्ट एका विशेष भूमिकेत दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे.

२०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तुंबाड' चित्रपटाने आपल्या वेगळ्या विषयामुळे आणि उत्कृष्ट सादरीकरणामुळे प्रेक्षकांवर मोहिनी घातली होती. या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबद्दल चाहत्यांमध्ये आधीच प्रचंड उत्सुकता आहे. त्यातच आता आलिया भट्ट या चित्रपटाचा भाग असणार असल्याने या प्रकल्पाची व्याप्ती अधिकच वाढली आहे. आलियाची ही भूमिका नेमकी काय असेल, हे अद्याप गुलदस्त्यात असले तरी, तिच्या उपस्थितीमुळे चित्रपटाला एक वेगळी उंची मिळेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी अद्याप या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिलेला नाही. मात्र, सोहम शाह आणि नवाझुद्दीन सिद्दीकी यांच्यासोबत आलिया भट्टला पडद्यावर पाहणे हा प्रेक्षकांसाठी एक नवा अनुभव ठरेल. 'तुंबाड'च्या पहिल्या भागाने निर्माण केलेले गूढ आणि भय या दुसऱ्या भागात कोणत्या स्तरावर जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जान्हवीचा धक्कादायक खुलासा...



**अभिनेत्री** जान्हवी कपूरने एका मुलाखतीदरम्यान आपल्या आयुष्यातील एका अत्यंत कठीण प्रसंगावर आणि त्यानंतर ओढवलेल्या मद्यपानाच्या सवयीवर मनमोकळेपणाने भाष्य केले आहे. एका क्लेशदायक अनुभवानंतर स्वतःला सावरण्यासाठी आपल्याला वारंवार मद्यपानाची गरज भासू लागली होती, अशी प्रांजळ कबुली तिने दिली आहे. जान्हवीच्या मते, त्या विशिष्ट काळामध्ये मानसिक अस्वस्थता इतकी वाढली होती की, त्यातून बाहेर पडण्यासाठी किंवा भावनांना सुन्न करण्यासाठी तिला मद्यपानाचा आधार घ्यावासा वाटला. स्वतःला पूर्णपणे विसरण्यासाठी किंवा त्या वेदनेपासून दूर जाण्यासाठी मला मद्यधुंद होण्याची गरज वाटत होती, असे तिने या मुलाखतीत नमूद केले. ग्लॅमरस जगाच्या पलीकडे कलाकारांनाही मानसिक संघर्षाचा सामना करावा लागतो, हेच तिच्या या विधानातून समोर आले आहे. मात्र, या संकटातून बाहेर पडणे किती महत्त्वाचे होते, हेदेखील तिने स्पष्ट केले. मानसिक आरोग्याशी झुंज देताना आलेल्या या अनुभवावर जान्हवीने पहिल्यांदाच इतक्या मोकळेपणाने संवाद साधला आहे.

## येतोय 'पगलैत'चा सिक्वेल



**सान्या** मल्होत्राची मुख्य भूमिका असलेल्या 'पगलैत' या चित्रपटाच्या दुसऱ्या भागावर शिक्कामोर्तब झाले आहे. शीख्या एंटरटेनमेंट आणि नेटफ्लिक्स इंडिया यांनी या चित्रपटाच्या सिक्वेलसाठी पुन्हा एकदा हातमिळवणी केल्याचे वृत्त आहे. २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'पगलैत' चित्रपटाला प्रेक्षक आणि समीक्षक अशा दोन्ही स्तरांतून उत्तम प्रतिसाद मिळाला होता. एका तरुण विधवेची स्वतःची ओळख शोधण्याची ही कथा कमालीची गाजली होती. आता या कथानकाचा पुढचा भाग नेमका कसा असेल, याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुसऱ्या भागाचे लेखन आणि दिग्दर्शन पहिल्या भागाचे दिग्दर्शक उमेश बिष्ट हेच करण्याची शक्यता आहे. सध्या या प्रकल्पाचे काम प्राथमिक स्तरावर असून, लवकरच याबाबतची अधिकृत घोषणा केली जाऊ शकते. नेटफ्लिक्सवर थेट प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटामुळे सान्या मल्होत्रा पुन्हा एकदा एका आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटसृष्टीतील या घडामोडींमुळे बॉलिवूडमध्ये सध्या या 'सिक्वेल'ची जोरदार चर्चा रंगली आहे.

हेल्दी Me

## डोळ्यांना खाज सुटतेय?



**डोळे** हे आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचे आणि संवेदनशील अवयव आहेत. सध्याच्या धावपळीच्या जीवनात तासन्तास मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्ही स्क्रीनसमोर वेळ घालवणे, बदलणारे हवामान, धूळ आणि वाढते प्रदूषण यांचा डोळ्यांवर अत्यंत वाईट परिणाम होत आहे.

यामुळे डोळ्यांत खाज सुटणे, जळजळ होणे, डोळे लाल होणे आणि कोरडेपणा जाणवणे अशा समस्या उद्भवतात. अनेकदा लोक या लक्षणांना किरकोळ समजून त्याकडे दुर्लक्ष करतात किंवा घरगुती उपाय करून पाहतात. परंतु आरोग्य तज्ज्ञांच्या मते, वेळीच लक्ष न दिल्यास या समस्या भविष्यात दृष्टीशी संबंधित गंभीर आजारांना निमंत्रण देऊ शकतात. डोळ्यांतील खाज आणि जळजळ होण्याची विविध कारणे असू शकतात. यामध्ये ॲलर्जी आणि संसर्ग ही सर्वात सामान्य कारणे आहेत. धूळ, माती, धूर आणि प्रदूषणामुळे डोळ्यांच्या नाजूक थरावर परिणाम होतो, ज्यामुळे डोळे लाल होतात आणि पाणी येते. तसेच, प्रदीर्घ काळ स्क्रीन पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. संसर्गामुळे डोळ्यांत वेदना, जळजळ आणि सूज येण्याची शक्यता असते. सुरुवातीला ही लक्षणे सौम्य वाटू शकतात. परंतु काही दिवसांत आराम न मिळाल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे अनिवार्य ठरते.


दिवसभरात पुरेसे पाणी पिणे आणि संतुलित आहार घेणे डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. आहारात 'व्हिटॅमिन ए' आणि 'ओमेगा-३ फॅटी ॲसिड' युक्त पदार्थांचा समावेश केल्यास डोळ्यांची दृष्टी चांगली राहते. स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. हात आणि चेहरा नेहमी स्वच्छ ठेवावा आणि डोळ्यांना वारंवार स्पर्श करणे टाळावे. प्रदूषण किंवा धुळीच्या ठिकाणी जाताना संरक्षक चष्मा वापरावा. डोळ्यांत खाज येत असल्यास ते जोरात चोळू नका. कारण यामुळे कॉर्नियाला इजा होऊन संसर्ग वाढू शकतो. दोन ते तीन दिवसांत साध्या उपायांनी आराम मिळाला नाही, तर त्वरित नेत्रतज्ज्ञांकडून तपासणी करून घ्यावी. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे 'स्टिरॉइड' युक्त आय ड्रॉप्स वापरणे डोळ्यांसाठी अत्यंत घातक ठरू शकते. घरगुती उपचार म्हणून गुलाब जल किंवा इतर कोणतेही द्रव पदार्थ थेट डोळ्यांत टाकण्यापूर्वी डॉक्टरांचे मत घेणे सुरक्षित ठरते. वेळेवर केलेली तपासणी आणि योग्य निगा राखल्यास डोळ्यांच्या गंभीर समस्या टाळता येतात. डोळ्यांत सतत कोरडेपणा जाणवत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने 'ल्युब्रिकेटिंग आय ड्रॉप्स'चा वापर करणे फायदेशीर ठरू शकते.




### हेल्दी टिप्स



- सुकामेवा किंवा ड्रायफ्रूट्समध्ये असणाऱ्या जर्दाळूमध्ये 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. एक कप कापलेले जर्दाळू सेवन केल्यास 'अ' जीवनसत्त्वाची कमतरता ६० टक्क्यांपर्यंत भरून निघते. रक्तकमतरतेचा आजार टाळण्यासाठी जर्दाळूचे सेवन केले पाहिजे. जर्दाळूमध्ये फायबर्स आणि लॅक्सेटिव्ह गुणही असतात. त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी जर्दाळूचे सेवन आवर्जून करावे. जर्दाळूमुळे त्वचा उजळते. मुरूम, पुटकुळ्या, त्वचेचा संसर्ग आदींमध्ये जर्दाळू सेवनाचा खूप फायदा होतो. जर्दाळूचे सेवन केल्यास यकृताची आतून स्वच्छता होते.



- बाजरी हे सध्याच्या जमान्यात 'सुपरफूड' म्हणून ओळखले जाते. पूर्वीच्या काळी महाराष्ट्रातील मुख्य आहारात बाजरीचा समावेश होता. धान्य वजन आणि कफ वाढू न देता शरीराचे पोषण करणारे आहे. त्यात १३ आवश्यक अमिनो आम्ले आहेत. हाडांना मजबूत करणारे फॉस्फरसदेखील बाजरीत असतात. मधुमेहींनी बाजरी आवर्जून सेवन केली पाहिजे. हल्ली ग्लूटेनची ॲलर्जी म्हणजे गव्हाचे पदार्थ खाल्ल्यावर पोट बिघडण्यासारखे त्रास होण्याची तक्रार वाढत चालली आहे. अशांसाठीही बाजरी चांगली.



- आम्लपित्ताचा किंवा अल्सरचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी नियमितपणे काळ्या मनुका आणि ज्येष्ठमध यांचा काढा घ्यावा. तसेच रात्री झोपताना एक कप कोमट दुधात एक चमचा साजूक तूप घालून प्यावे. नवीन धान्ये खाऊ नयेत. सहा महिने जुने धान्य वापरावे. या रुग्णांनी दिवसा चुकूनही झोपू नये.

## मधुमेहींनी किती काळ चालावे?



**मधुमेहाच्या** व्यवस्थापनात केवळ आहार आणि औषधे पुरेशी नसतात. योग्य व्यायाम आणि जीवनशैलीची जोड नसल्यास रक्तातील साखरेवर नियंत्रण मिळवणे कठीण होऊन बसते. अनेकदा उत्तम आहार घेऊन आणि वेळेवर औषधे घेऊनही साखर वाढत असल्याचे दिसते. यामागे मानसिक ताण, अपुरी झोप किंवा रात्री उशिरा झोपणे आणि जेवण झाल्यावर लगेच अंथरुणावर पडणे ही प्रमुख कारणे असू शकतात. चालण्यामुळे मधुमेह नियंत्रित करणे सोपे होते. परंतु नेमके किती चालावे आणि जेवणानंतर रक्तातील साखर वाढू नये म्हणून कोणती पद्धत वापरावी, हे समजून घेणे आवश्यक आहे.

दैनंदिन चालण्याचे महत्त्व आणि फायदे अनेक संशोधनांतून असे समोर आले आहे की, नियमित चालण्यामुळे शरीरातील साखर, रक्तदाब आणि वजन या तिन्ही महत्त्वाच्या गोष्टींवर सकारात्मक परिणाम होतो. चालणे हा केवळ व्यायाम नसून ती एक निकोप जीवनशैलीची पायाभूत सवय आहे. यामुळे मानसिक आरोग्य सुधारते आणि सांध्यांची लवचिकताही टिकून राहते.

**किती वेळ चालावे?**

तज्ज्ञांचा सल्ला आंतरराष्ट्रीय आरोग्य मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रौढ व्यक्तीने दिवसातून किमान ३० मिनिटे मध्यम स्वरूपाचा शारीरिक व्यायाम करणे गरजेचे आहे. मधुमेहाच्या रुग्णांनाही हाच नियम लागू होतो. मात्र, वयोमान आणि प्रकृतीनुसार यात बदल होऊ शकतो. सुरुवातीला एकदम जास्त चालण्याऐवजी १० मिनिटांपासून सुरुवात करून हळूहळू हा वेळ १५, २० आणि अखेर ३० मिनिटांपर्यंत वाढवावा, जेणेकरून शरीरावर अचानक ताण येणार नाही.

**जेवणानंतर चालण्याचे विशेष तंत्र**

मधुमेह नियंत्रणात जेवणानंतरची हालचाल अत्यंत प्रभावी मानली जाते. वैद्यकीय अभ्यासानुसार, जेवल्यानंतर थोडा वेळ चालल्यामुळे रक्तातील ग्लुकोजची पातळी अचानक वाढत नाही. म्हणूनच अनेक डॉक्टर सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण अशा तिन्ही वेळेनंतर चालण्याचा सल्ला देतात. यामुळे पचनक्रिया सक्रिय राहते आणि ऊर्जेचा वापर संतुलित होतो. आजकाल दररोज १०,००० पावले चालण्याचा कल दिसून येतो. मात्र, मधुमेहाच्या रुग्णांसाठी सुरुवातीला ५,००० ते ७,००० पावले सुद्धा पुरेशी ठरू शकतात. जशी शरीराची क्षमता वाढेल, तशी पावलांची संख्या वाढवता येते. महत्त्वाचे म्हणजे, हे चालणे नियमित आणि सुरक्षित पद्धतीने होणे गरजेचे आहे.

**जेवणानंतर कधी आणि किती चालावे?**

जेवणानंतर शरीरातील ग्लुकोजची पातळी वेगाने वाढते. अशा वेळी जेवण झाल्यापासून १० ते १५ मिनिटांच्या आत साधारण १० ते २० मिनिटे संथ गतीने चालल्यास पचनप्रक्रिया वेगवान होते. यामुळे रक्तातील ग्लुकोज रक्तात मिसळून पातळी वाढवण्याऐवजी स्नायूंद्वारे ऊर्जेच्या रूपात वापरले जाऊ लागते. परिणामी, जेवणानंतरची साखर नियंत्रणात राहण्यास मदत होते.

## गरोदरपणात पित्ताशयातील खड्यांचा धोका का वाढतो?



**गर्भावस्थेचा** काळ हा स्त्रीच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण असला, तरी या काळात शरीरात होणाऱ्या हार्मोनल बदलांमुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. एका अंदाजानुसार, गरोदरपणात साधारणतः ८ ते १२ टक्के महिलांमध्ये पित्ताशयातील खडे (गॉलस्टोन) निर्माण होण्याची शक्यता असते. यातील अनेक महिलांमध्ये लक्षणे दिसत नसली तरी, हा धोका नेमका का निर्माण होतो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

तज्ज्ञांच्या मते, या समस्येमागे दोन मुख्य संप्रेरके (हार्मोन) कारणीभूत असतात. एस्ट्रोजन या संप्रेरकाची पातळी वाढल्यामुळे पित्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. तसेच प्रोजेस्टेरॉन हे संप्रेरक पित्ताशयाचे स्नायू शिथिल करते. ज्यामुळे पित्त पूर्णपणे बाहेर पडू शकत नाही. जेव्हा पित्त दीर्घकाळ पित्ताशयात साठून राहते, तेव्हा कोलेस्ट्रॉलचे लहान कण एकत्र येऊन खड्याचे रूप घेतात. वाढत्या गर्भाशयामुळे पित्ताशयावर पडणारा दबाव ही समस्या अधिक गंभीर करतो.

तज्ज्ञांच्या मते, प्रत्येक पुढच्या गर्भधारणेसह हा धोका वाढत जातो. पहिल्या गरोदरपणात झालेला परिणाम दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेळेस अधिक संचित होतो. ज्या महिलांनी तीन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा गर्भधारणा केली आहे, त्यांच्यात पित्ताशयातील खडे होण्याचा धोका सर्वाधिक असतो.

लक्षणे कशी ओळखावीत?


हा सामान्य पोटदुखीचा त्रास आहे की, पित्ताशयातील खडा, हे काही विशिष्ट लक्षणांवरून ओळखता येते. पोटाच्या वरच्या उजव्या भागात अचानक तीव्र वेदना होणे हे याचे प्रमुख लक्षण आहे. हे दुखणे खांद्यापर्यंत किंवा पाठीच्या उजव्या बाजूला पसरू शकते. विशेषतः तळलेले किंवा तेलकट पदार्थ खाल्ल्यानंतर एक ते दोन तासांनी या वेदना सुरू होतात. यासोबतच मळमळणे, उलट्या होणे, पोट फुगणे आणि कधीकधी हलका ताप येणे अशी लक्षणे दिसून येतात.

**दुर्लक्ष केल्यास उद्भवू शकतात गंभीर समस्या**

जर खडा पित्तनलिकेत अडकला, तर त्यामुळे कावीळ, तीव्र ताप किंवा पॅनक्रियाटायटिस (स्वादुपिंडाची सूज) यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. हे आई आणि बाळ दोघांसाठीही धोकादायक असून, काही वेळा यामुळे मुदतपूर्व प्रसूती (प्री-मॅच्युअर डिलिव्हरी) होण्याचा धोका असतो.



# नवाकाळ शब्दकोडे–१५९५



**आडवे शब्द –**

१. जोराचा प्रहार, आघात ३. अस्ताव्यस्त, गबाळा ७. वजन अचूक करणारा तराजू, चोख व्यवहाराचे प्रतीक ११. होमहवन, यज्ञ १३. बोजवारा उडणे- xx xx वाजणे १४. अस्थिर (संपत्ती), जंगम मालमत्ता १५. ध्येय, मुक्कामाचे ठिकाण १८. प्रखर, जोरदार १९. चिंतनात गढलेला २०. रिक्त, रिकामा २१. महिना, माह २२. वेस, हद्द २४. पराकाष्ठा, प्रयास २६. पादत्राण २८. निळे आकाश ३०. स्वच्छंद, बंधनाशिवाय ३१. धडपड, ३३. मार्ग ३५. नम्रता ३७. दुर्दैवी ३९. वाईट कृत्य ४०. भीड, आग्रह ४२. प्रहर ४३. दिशादर्शक यंत्र ४५. अतिशय क्षुद्र मनुष्य ४८. फुटाणे ४९. महाविद्यालयात अध्यापन करणारा ५१. बोलणे, शब्द, विधान ५२. शत्रूचे आक्रमण ५५. गर्दभ ५७. श्रीकृष्ण ५८. औषध ५९. भवानीदेवीने वध केलेला राक्षस ६२. झाडणी, केरसुणी, कुंचा ६३. उत्कर्ष, भरभराट ७. मोठी मौज ६९. आमंत्रणाशिवाय घुसलेला, अनाहूत ७०. चतकोर ७१. लहान, छोटासा ७२. सद्दी, चांगला काळ ७३. किंचितही अंश ७६. तजेला ७८. आर्थिक सुगी ८०. नमस्कार ८१. तबलावादक ८४. टपाल ८५. बैठ्या आंदोलनाचा प्रकार ८६. ठार करणे ८८. माळ ८९. व्रत, नेम ९१. सरिता ९३. सरकारी मालकीचे ९७. मसाल्याच्या पदार्थातले 'पान' ९८. हेळसांड १००. सोमवारी आलेली अमावस्या १०२. मिठाईचा प्रकार १०३. कंठ १०४. काचेच्या बांगड्या १०५. उभे पिक उद्ध्वस्त करणारे संकट १०६. रक्तवाहिनी

**उभे शब्द –**

१. समर्थांची दासबोधात आलेली शिकवण- 'जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूचि शोधोनि पाहे, मना त्वाचि रे पूर्वसंचित केले.....' २. कलंक, दागिना, सामानातील वस्तू ४. सुविधा, प्रबंध ५. अवस्था ६. पुत्र ७. युद्धभूमी ८. व्याघ्र ९. लहान चुकीचे मोठे परिणाम भोगावे लागणे या अर्थाचा वाक्प्रचार १०. जोडलेले, पुरवणी १२. निर्दालन १४. स्त्रीच्या नाकातला बारीक दागिना १६. व्यसनात बुडालेला १७. प्रारब्ध, दैव २०अ. जेवणाची थाळी २३. इच्छितप्राप्तीचा आशीर्वाद २४. झोपण्याची सोय असलेला रेल्वेचा डबा २५. आक्षेप २७. जाडसर दळलेले गहू २९. लाजिरवाणे ३२. सरकारी अर्जाचा नमुना, फॉर्म ३४. गुंड ३६. प्राण नेणारा देव ३९. प्रघात ४१. रामदासस्वामींचा प्रसिद्ध ग्रंथ ४४. परका, बाहेरचा ४६. कोकणातील एक बोली ४७. उद्यानंतरचा दिवस ४८. वेडपट ५०. कौशल्य ५२. याचना करणे ५३. बुरखा ५४. निर्दय ५६. वारेमाप ५७. कुरघोडी ६०. फायद्याची गोष्ट, कल्याण ६१. आळसावलेला ६४. कोर्टखटला ६५. पृथ्वी ६६. खड्ग ६८. झाडाला फुटलेली नवी पाने ७०. स्वामी स्वरूपानंदांचा जेथे निवास होता ते रत्नागिरीजवळचे गाव ७२. लगेच ७४. शांतवन ७५. थंड ७७. बटाट्याचा लोकप्रिय तळीव पदार्थ ७८. वेगवान ७९. पृष्ठभागाचा लहानसा तुकडा ८२. पदच्युत करणे ८३. प्राणप्रिय ८७. चंचल धोरण ९०. पिंजरा ९२. दिवा ९४. चांगल्या आंब्याचे वैशिष्ट्य ९५. बस्तान ९६. आईची बहीण ९९. वाळवंट १०१. किनारा

●

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** ३. गोफण ५. नभ ७. असहाय १०. माता १२. यशवंत १४. उदरनिर्वाह १५. थाटमाट १६. तडकाफडकी १७. पार्थ १८. लघु १९. रडारड २१. सवतासुभा २३. मैदान २४. राडा २५. बीट २६. रीत २८. सीमा २९. माघ ३०. शिखर ३२. अटकळ ३५. उगवती ३७. नाग ३८. रणरागिणी ३९. दानव ४१. निवडणूक आयोग ४३. वरीस ४५. लाड ४६. याम ४९. साळसूद ५१. बखोट ५३. डाग ५५. रंगदेवता ५८. मोठा ६०. नकार ६१. पकड ६४. मज्जाव ६६. दास्य ६७. सुरेख ६८. शिकरण ६९. रासभ ७१. आम ७२. पारख ७३. दखलपात्र ७४. कालहरण ७६. रसा ७७. ठेकेदार ७९. खवले ८०. आव ८२. व्यासंग ८४. बाग ८५. श्रीगणेशा ८७. वजन ८८. चिंधीचोर ९०. नान ९२. खासियत ९३. विषमता ९४. पवनचक्की

**उभे शब्द :** १. काय भुललासी वरलिया रंगा २. जिवंत ४. फरपट ५. नद ६. भरपूर ७. अर्वाच्य ८. सह ९. यर्थाथता १०. मामा ११. ताटवा १३. तडफदार १४. उकीरडा १७. पावपट २०. डबीर २२. भारी २४. राघवदास २७. तगमग २९. माग ३१. खच्ची ३२. अगडबंब ३३. कलकलाट ३४. नाराज ३५. उणीव ३६. तीन ३७. नाव ४०. वर्दळ ४१. निनाद ४२. आड ४४. रीठा ४७. मग ४८. दैव ४९. साठा ५०. सूप ५२. खोडा ५३. डाका ५४. गरम मसाले ५६. देखरेख ठेवणे ५७. ताप ५८. मोड ५९. लज्जा ६०. नस्य ६२. कणखर ६३. एकत्र ६४. मणका ६५. वराह ६६. दाभण ६७. सुर ६८. शिपाई ७०. सरडा ७१. आरव ७२. पाड ७३. ददात ७५. लड्डू ७८. असंतोष ७९. खग ८०. आगम ८१. रजत ८३. आधी ८४. बारव ८६. शाखा ८७. वय ८८. चिंता ८९. चोप ९०. नाच ९१. नक्की

---

## अंध-बहिरी असूनही सारा मोईनला आयएससी परीक्षेत ९८.७ टक्के गुण

पान १ वरून

पाहण्याची, ऐकण्याची आणि बोलण्याची क्षमता हळूहळू पूर्णपणे कमी झाली. त्यामुळे शिक्षण घेणे तिच्यासाठी अधिक कठीण बनले. हुसैनगंजमधील शाळेत शिक्षण सुरू ठेवताना तिला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. तिच्या उपचारासाठी आम्हाला हैदराबादसह अनेक ठिकाणी जावे लागले. ती अभ्यास करू शकत नव्हती आणि अखेरीस तिला शाळा सोडावी लागली होती.

अहमद पुढे बोलताना म्हणाले की, साराच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा तेव्हा आला जेव्हा ख्राईस्ट चर्च कॉलेजने समावेशक शिक्षणाच्या दिशेने पुढाकार घेतला. शाळेने विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी स्वतंत्र विभाग सुरू केला. विशेष शिक्षकांची नियुक्ती केली. आता शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर साराने भविष्यासाठी मोठे ध्येय ठेवले आहे. प्रतिष्ठित संस्थेतून पदवी शिक्षण पूर्ण करून त्यानंतर अत्यंत स्पर्धात्मक युपीएससी नागरी सेवा परीक्षा देण्याची आणि आयएएस अधिकारी बनून देशसेवा करण्याची तिची इच्छा आहे.

पान १ वरून

आले आहे. मात्र, तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी न्यायालयात आरोपीच्या कोठडीची मागणी करताना तपासासाठी कोठडी आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला.

शरद पवार गटाचे आ. रोहित पवार आज म्हणाले की, मुलीच्या आईला आणि एका चुलत भावालाही भेटलो. मात्र, मुलीच्या वडिलांच्या म्हणण्याचा सन्मान केला पाहिजे. मला हे माहिती असते, तर मीदेखील येथे आलो नसतो. मात्र, काल जे आंदोलन झाले ते आंदोलन आणि पीडितेच्या कुटुंबियांच्या इतर काही अडचणी होत्या त्या समजून घेण्यासाठी आलो. यात कोणीही राजकारण करू नये. ही आमचीही भूमिका आहे. मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला आहे की, १४ दिवसांमध्ये

## माझ्या मुलीला न्याय मिळेपर्यंत राजकारण्यांनी भेटायला येऊ नये

आम्ही हे प्रकरण निकाली काढू. आजची परिस्थिती पाहिली तर हा आकडा फक्त शब्दाचा नसावा, हीच अपेक्षा आहे. कारण चार्जशीट दाखल करण्यासाठीच पंधरा दिवस लागणार आहेत. सरकारने या विषयात लक्ष घालून लवकरात लवकर कारवाई केली पाहिजे. राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद रिक्त आहे. त्या पदावर निवृत्त आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर, निवृत्त आयएएस मेधा गाडगीळ, सामाजिक कार्यकर्त्या वर्षा देशपांडे, मनीषा गुप्ते यांच्यापैकी एकाची नियुक्ती करावी. पण राजकीय व्यक्ती महिला आयोगावर नको याची दक्षता सरकारने घ्यावी. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी काल स्वतः पीडितेच्या वडिलांशी दोन वेळा बोललो. मी त्यांना समजून सांगितले की, नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा करून द्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशिट दाखल होणे आणि केस दाखल करण्यासाठी आम्ही उच्च न्यायालयाच्या माध्यमातून सर्व गोष्टी फास्ट ट्रॅकवर करत आहोत. रेकॉर्ड वेळेत काम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्याला वाटते की, अशा नराधमाला भर चौकात फाशी दिली पाहिजे. पण ते लोकशाहीत करता येत नाही. कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये या दृष्टीने पळवाटा काढून या नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा कशी होईल यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रयत्न केला जाईल.


**PUBLIC NOTICE**

In the matter of Arbitration Proceedings BEFORE THE LEARNED SOLE ARBITRATOR MR. JANAY JAIN.

Notice is hereby given to you, Mr. Kamlesh Ganesh Jha, the Respondent, that arbitration proceedings have been initiated against you at the instance of the Claimants viz. Gunvanti Ramesh Shah & Ors. in the matter between Gunvanti Ramesh Shah & Ors. Versus Nine Globe Builders & Ors.

Despite best efforts, you could not be served at your last known address situated at Room No.3, Janendrakar Chawl, Dhobi Ghat, Tanaji Nagar, Kurar Village, Near Durga Temple, Malad (East), Mumbai - 400 097., and your present whereabouts are not known.

Be that as it may, You are hereby called upon to appear before the Learned Sole Arbitrator in the said proceedings on 05.05.2026 at 2:30PM virtually, failing which the matter shall proceed ex-parte against you.

The proceedings shall be cond--ucted via Google Meet, and you may join using the following link:

Tuesday, May 5 at 14:30 Hours

Google Meet joining info: Video call link: https://meet.google.com/pmd-zdod-xdf

You are further at liberty to file your reply/defence along with relevant documents before the said date.

Sd/-
Counsel for the Claimant
Yogesh Devnani



फॉर्म जी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण
**जे मोदी व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड**
२०१, सी विंग, इमारत क्र.२, एस्के रिसॉर्ट समोर, ॲमेझॉन पार्क, न्यू लिंक रोड, मंडपेश्वर, बोरिवली पश्चिम, मुंबई - ४००१०३, महाराष्ट्र येथे लोखंड आणि पोलादाच्या व्यापारात कार्यरत

(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ३६ए चे उप-विनियमन (१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशिल | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन /आणि सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | जे मोदी व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड<br>पॅन: AAHCM8729L<br>सीआयएन: U74900MH2011PTC224264 |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | २०१, सी विंग, इमारत क्र. २, एस्के रिसॉर्ट समोर, ॲमेझॉन पार्क, न्यू लिंक रोड, मंडपेश्वर, बोरिवली पश्चिम, मुंबई - ४००१०३, महाराष्ट्र |
| ३. | वेबसाइटची युआरएल | उपलब्ध नाही |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | नालासोपारा |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | लागू नाही कारण सीडी ०१.०४.२०१९ पासून कार्यरत नाही. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | लागू नाही कारण सीडी ०१.०४.२०१९ पासून कार्यरत नाही. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | उपलब्ध नाही |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | तपशिल cirp.jmodi@gmail.com या पत्त्यावर ईमेल पाठवून मिळवता येतील. |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता येथे उपलब्ध आहे: | तपशिल cirp.jmodi@gmail.com या पत्त्यावर ईमेल पाठवून मिळवता येतील. |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | १९.०५.२०२६ |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | २९.०५.२०२६ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | ०३.०६.२०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | १३.०६.२०२६ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | १८.०६.२०२६ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | १८.०७.२०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.jmodi@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | उपलब्ध नाही |

दिनांक: ०४.०५.२०२६
ठिकाण: मुंबई

सही/-
मनीष लालजी दावडा
रिझोल्यूशन प्रोफेशनल
जे मोदी व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड
नोंद.क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02506/2021-2022/13797
एएफए क्र. : एए१/१३७९७/०२/३००६२६/१०८२७०
वैधता: ३० जून २०२६ पर्यंत


## मीच का? तुम्हाला स्वत:चा आवाज नाही? महाजनांना प्रश्न विचारणाऱ्या टीना यांची भूमिका

पान १ वरून

३० मिनिटे मी गाडीतच होते. गाडी हलत नसल्यामुळे मी बाहेर येऊन काय चालले आहे, हे पाहण्यासाठी गेले. तेव्हा कळले की, आमच्या पुढे उभ्या असलेल्या बस पार्किंग केल्या होत्या. त्या तिथून हलतच नव्हत्या. पुढचा अर्धा तास मी प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याला जाऊन त्या बस काढण्यासंदर्भात विनंती करत होते. पण कोणीच मला दाद दिली नाही. कोणी माझे ऐकतही नव्हते. मी जी बाटली फेकली ती कोणत्याही मोर्चेकरी किंवा पोलिसावर फेकली नाही तर फक्त लक्ष वेधून घेण्यासाठी ती कृती केली. कारण मी रस्त्याच्या पलीकडे उभी होते आणि माझ्या कमरेपर्यंत दुभाजक होता.

पोलिसांवर टीका करताना त्या म्हणाल्या की, माझे आजोबा आणि वडील भारतीय सैन्य दलात होते. त्यांनी देशासाठी दोन युद्ध लढली आहेत. माझ्या कुटुंबातील एकूण ८ जणांनी भारतीय सैन्य दलात सेवा दिली आहे. मी 'सेवा' या शब्दावर जोर देते. कारण तुम्ही जेव्हा गणवेश परिधान करता तेव्हा तुम्ही जनतेचे सेवक असता. गणवेश घातला म्हणजे तुम्हाला एखाद्याचा अवमान करण्याचा किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार मिळत नाही. तर गिरीश महाजन यांच्याबद्दल टीना म्हणाल्या, महाजन यांच्यापर्यंत मी पोहोचले तेव्हा सव्वासहा वाजले होते. माझ्या मुलीपर्यंत मी कसे पोहोचणार? हाच प्रश्न माझ्या डोक्यात होता. यावेळी त्या मोर्चात महाजन असे एकच व्यक्ती होते ज्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले. त्यांनी पोलिसांना सूचना देऊन त्या बस बाजूला सारण्याचे निर्देश दिले. बस बाजूला झाल्यानंतर आम्ही आमची वाहने मागे घेऊन दुसऱ्या मार्गाने प्रवास केला. सर्व राजकीय पक्षांना सुनावत त्या म्हणाल्या की, माझ्या खांद्यावर बंदूक ठेवून कोणत्याही पक्षाने त्यांची राजकीय पोळी भाजू नये. तुम्ही सर्व राजकीय पक्ष एकसारखेच असून, तुम्ही सर्वच असल्या प्रकारच्या गोष्टी करता आणि सामान्य माणसाला वेठीस धरता.

## राज्याच्या तिजोरीला गळती ३२ हजार कोटींचा महसूल थकीत

पान १ वरून

कर थकीत असतानाही त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले. आरटीओचा अद्ययावत डेटा नसल्याने करचुकव्यांना संधी मिळत असल्याचा ठपका ठेवला आहे. मुद्रांक शुल्कातही मोठी गळती झाल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे. गृहनिर्माण प्रकल्प आणि व्यावसायिक करारांमध्ये रेडीरेकनरचे दर चुकीचे लावून शासनाची फसवणूक झाली आहे. नियमबाह्य सवलती देणे आणि उल्लंघनांवर कारवाई न करणे, यामुळे शासनाचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचे नमूद आहे. अनधिकृत गौण खनिज उत्खननामुळे महसूल बुडाल्याबरोबरच पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत असल्याचे 'कॅग'ने अधोरेखित केले. रॉयल्टी न भरता मोठ्या प्रमाणावर उत्खनन आणि वाहतूक सुरू असतानाही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. प्रशासकीय सुस्ती, देखरेखीचा अभाव आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अपुरा वापर यामुळे महसूल वसुलीत मोठे अपयश आल्याचा ठपका 'कॅग'ने ठेवला आहे.

वसुलीसाठी सक्षम यंत्रणा नाही, अशा शब्दांत सरकारला फटकारत तातडीने सुधारणा न केल्यास राज्याच्या विकासावर परिणाम होईल, असा इशारा 'कॅग'ने दिला आहे.


**सूचना**
**(सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेमधील, मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरणासंदर्भात दावे किंवा हरकती आमंत्रित करत आहे)**

मालाड शॉपिंग सेंटर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, पत्ता एस. व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई–४०००६४ चे सभासद श्री. अंबालाल रतनशी गडा; सोसायटीच्या इमारतीतील तळमजल्यावरील दुकान क्र.४४ चे धारक असून, त्यांच्याकडे भाग प्रमाणपत्र क्र.१४३, विशिष्ट क्र.७७६ ते ७८० (समाविष्ट), यांचे दिनांक १४.०२.२०२४ रोजी कोणतीही नामनिर्देशन न करता निधन झाले आहे.

सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ (पंधरा) दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटींच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी स.११.०० ते ५.०० वा. दरम्यान उपलब्ध आहेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०४.०५.२०२६

**दि मालाड शॉपिंग सेंटर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या वतीने व करिता**
**माननीय सचिव यांच्यामार्फत**


## बीडमधील केज येथे ३ वर्षांच्या नातीवर आजोबाचा अत्याचार! नराधमाला अटक

पान १ वरून

या नराधमाने चिमुरड्या नातीवर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केले. हा नराधम वारंवार कुकर्म करत असल्याने त्या चिमुकलीला शारीरिक त्रास होऊ लागला. वेदना सहन न झाल्याने शेवटी त्या मुलीने घडलेला सर्व प्रकार आपल्या आईला सांगितला. आपल्या पोटच्या लेकीवर स्वतःच्या वडिलांनीच असा अत्याचार केल्याचे ऐकताच आईला मोठा धक्का बसला. त्यानंतर तिने विलंब न करता पोलिसांकडे धाव घेण्याचा निर्णय घेतला. पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून युसूफवडगाव पोलीस ठाण्यात नराधम आजोबाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी पोक्सोच्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. शुक्रवारी रात्री पोलिसांनी या नराधम आजोबाला अटक केली. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

### चाकणमध्ये ११ वर्षीय मुलीचा विनयभंग! नराधमाला बेड्या

पान १ वरून

असल्याचे पाहून आरोपी अरुण गयाप्रसाद मिश्रा (३२) याने घराच्या कंपाऊंडमध्ये प्रवेश केला आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. चिमुकली प्रसंगावधान दाखवून तेथून पळ काढल्याने बचावली. मुलीने हा प्रकार आपल्या वडिलांना सांगितल्यानंतर, वडिलांनी तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. उत्तर चाकण पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम राबवून आरोपी अरुण मिश्रा याला ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यात एकामागून एक घडणाऱ्या या घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## धरण दुर्घटनेत मायलेकाचा मृत्यू व्हायरल व्हिडिओ-फोटो एआय निर्मित

पान १ वरून

वेगळी असून, अशा प्रकारचे दिशाभूल करणारे फोटो सोशल मीडियावर वेगाने पसरत असल्याने नागरिकांनी माहितीची खातरजमा करूनच ती शेअर करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

दरम्यान, मध्य प्रदेशातील या दुर्घटनेत या दुर्घटनेतील मृतांचा आकडा आता १३ झाला असून, मृतांमध्ये ४ मुले आणि ८ महिलांचा समावेश आहे. चौथ्या दिवशी बचाव पथकाने आज काका-पुतण्याचे मृतदेह बाहेर काढले. आज सकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास ८ वर्षांचा मयूरन याचा मृतदेह सापडला. तो तामिळनाडूतील त्रिची येथून आपल्या कुटुंबासह पर्यटनासाठी आला होता. त्यानंतर सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास त्याचे काका कामराज आर. यांचा मृतदेह पथकाला सापडला. काल सायंकाळी दोन लहान मुलांचे मृतदेह सापडले होते. त्यापैकी एकाची ओळख श्रीतमिल (५) तर दुसऱ्याची विराज सोनी (५) आहे. ३० एप्रिल रोजी झालेल्या बर्गी क्रूझ दुर्घटनेत चार दिवसांत एकूण १३ मृतदेह सापडले असून, शोधमोहीम अद्याप सुरू आहे.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम प्रकल्प विभाग, पुणे- ४११ ००१**
**दुरध्वनी क्रमांक ०२० - २९९८५८६१**
**Web- www.mahapwd.gov.in & e-mail - projectpune.ee@mahapwd.gov.in**
**ई-निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२६-२०२७ तृतीय (ऑफलाईन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प्रकल्प) विभाग, पुणे ४११ ००१ (दुरध्वनी ०२०- २९९८५८६१)** हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून या विभागाच्या कार्यकक्षेतील **रुपये १०.०० लक्ष** पेक्षा कमी किंमतीचे कामांकरीता **ब-१** नमुन्यातील कोरे निविदा संच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या www. mahapwd.gov.in- **Important Application** वरील **Pay PWD Online** या संकेतस्थळावर **दिनांक ०४.०५.२०२६ ते दिनांक ११.०५.२०२६** पर्यंत निविदा शुल्क भरण्यात येऊन डाऊनलोड केलेल्या निविदाची प्रिंट घेऊन हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदर भरलेल्या निविदा सिलबंद करुन कार्यकारी अभियंता, सा.बां. (प्रकल्प) विभाग, २ रा मजला आर्सेन्ल फ्लॅट, हॉटेल सागर प्लाझा समोर, पुणे कॅम्प, पुणे- ४११००१, पुणे यांचे कार्यालयात **दिनांक १३.०५.२०२६ रोजी दुपारी १४.०० वाजेपर्यंत** स्वीकारतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी १४.३० नंतर उघडतील.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. (प्रकल्प) विभाग, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

सही/-
(प्रशांत वि. पंडित)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (प्रकल्प) विभाग,
पुणे- ४११ ००१

जिमाका/पुणे/जाहिरात/ ३४/२०२६-२७

शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
अॅगमार्क
फोंडाघाट फार्मसी
मुंबई - १६. फोन : २४३० ८५४२

नवाकाळ
• पुणे | सोमवार ४ मे, २०२६ • पान -८

# मित्तल कुटुंब-अदर पूनावाला यांनी राजस्थान रॉयल्स संघ ५,६६० कोटी रुपयांना विकत घेतला

■ नवी दिल्ली

**लक्ष्मी** निवास मित्तल, आदित्य मित्तल, विनिशा आणि अदर पूनावाला यांनी एकत्र येत राजस्थान रॉयल्स संघ १.६५ अब्ज डॉलरला म्हणजे १५,६६० कोटी रुपयांना विकत घेतला आहे. यापूर्वी कल सोमानी यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकास्थित समूहाला निधीअभावी आणि नियामक अडचणींमुळे हा व्यवहार पूर्ण करता आला नव्हता. नव्या करारानुसार मित्तल कुटुंबाकडे ७५ टक्के हिस्सा असेल, तर अदर पूनावालांकडे १८ टक्के हिस्सा असेल. उर्वरित ७ टक्के हिस्सा मनोज बडाले यांच्यासह विद्यमान गुंतवणूकदारांकडे कायम राहणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

स्टील उद्योगातील अब्जाधीश व आर्सेलर मित्तलचे संस्थापक लक्ष्मी मित्तल यांच्या कुटुंबाने सिरम इन्स्टिट्यूटचे मालक अदर पूनावाला यांच्या भागीदारीत राजस्थान रॉयल्समधील नियंत्रणात्मक हिस्सा विकत घेण्याचा करार केला आहे. मित्तल कुटुंब आणि अदर पूनावाला यांनी मनोज बडाले आणि त्यांच्या समूहाकडून राजस्थान रॉयल्सचे अधिग्रहण केले आहे. या करारात राजस्थान रॉयल्सचा आयपीएल पुरुष संघ, दक्षिण आफ्रिकेतील पार्ल रॉयल्स आणि कॅरिबियनमधील बार्बाडोस रॉयल्स यांचाही समावेश आहे. हा व्यवहार २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत





पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्यासाठी बीसीसीआय, भारतीय स्पर्धा आयोग, आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल आणि इतर नियामक संस्थांच्या मंजुरीची आवश्यकता आहे.

# महिलांनी गर्भाशयातील गाठींकडे दुर्लक्ष करू नये!

## डॉ. रश्मी यांचा सल्ला

**गर्भाशयात गाठ आहे (फायब्रॉईड्स) हे ऐकताना अनेक महिलांच्या मनात भीती निर्माण होते. मात्र अशी गाठ कर्करोगजन्य नसून महिलांमध्ये आढळणारा एक सामान्य त्रास आहे. अनेक वेळा याची लक्षणे जाणवत नाहीत, तर काही वेळा पाळीतील अनियमितता, जास्त रक्तस्त्राव किंवा पोटदुखी यांसारख्या समस्या दिसून येतात. अशावेळी घाबरून न जाता योग्य वेळी निदान आणि उपचार घेणे महत्त्वाचे ठरते. फायब्रॉईड्स नेमके काय असतात, त्यांची लक्षणे आणि उपचारपद्धती याविषयी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रश्मी फडणवीस यांनी 'नवाकाळ'च्या वेदिका मांगेला यांना सविस्तर माहिती दिली.**

**महिलांच्यात गाठी होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचे नेमके कारण काय आहे?**

**डॉ. रश्मी फडणवीस-** गर्भाशयातील फायब्रॉईड (गाठी) कोणालाही कधीही होऊ शकतात. त्यामुळे त्या तयार होत असताना आपल्याला त्याची जाणीव होत नाही. हे फायब्रॉईड्स नेमके का होतात, हे पूर्णपणे स्पष्ट नाही. मात्र आहार हा एक महत्त्वाचा घटक आहे. आहारात प्रोटीन कमी आणि कार्बोहायड्रेट जास्त असल्यास पेशींची वाढ होऊ शकते. तरीही हे नेमके कधी आणि कोणाला होतील, हे निश्चितपणे सांगता येत नाही.

**त्याची लक्षणे कोणती दिसतात?**

**डॉ. रश्मी फडणवीस-** सर्व फायब्रॉईड्सची लक्षणे दिसतात असे नाही. फायब्रॉईड्स मूत्राशयावर दाब देत असतील, तर वारंवार लघवी लागणे किंवा मूत्राशयाशी संबंधित त्रास जाणवू शकतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, फायब्रॉईड्सचा आकार आणि त्यातून होणारा त्रास यावरच उपचार ठरवले जातात. लक्षणांबद्दल बोलायचे झाल्यास- मूत्रदाह होणे, वारंवार लघवी लागणे, मूत्रनलिकेवर दाब आल्यामुळे संसर्ग वाढणे, पोटदुखी जाणवणे अशी लक्षणे दिसू शकतात. आकारानुसार वेदना कमी-जास्त असू शकतात. जर फायब्रॉईड्स गर्भाशयाच्या आतील आवरणावर परिणाम करत असतील, तर त्या आवरणाची जाडी वाढून जास्त रक्तस्त्राव होऊ शकतो.

रक्तस्त्राव खूप जास्त (नेहमीपेक्षा अधिक) होतो आणि तो अनेकदा गोळ्या घेतल्यावरच थांबतो. जर या गाठी गर्भाशयाच्या स्नायूंच्या थरात वाढल्या, तर त्यांना इंट्राम्युरल फायब्रॉईड म्हणतात. अशावेळी गर्भाशयाचा आकार नेहमीच्या आकारापेक्षा मोठा होतो. या गाठीमुळे पोटदुखी जाणवत राहू शकते. याशिवाय विशेष त्रास जाणवत नाही. जर गाठी गर्भाशयाच्या बाहेरील आवरणावर असतील, तर त्यांना सबसेरोसल फायब्रॉईड म्हणतात. अशा गाठींमुळे सुरुवातीला विशेष त्रास होत नाही. त्या वाढत राहतात आणि खूप मोठ्या झाल्यावरच त्रास जाणवू शकतो. जर गर्भाशयातील गाठींचा आकार तीन सेंटीमीटरपेक्षा जास्त असेल, तर त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**या गाठी काढणे अनिवार्य आहे की त्या औषधांनी बऱ्या होऊ शकतात?**

**डॉ. रश्मी फडणवीस-** सध्या वैद्यकीय क्षेत्रात नवीन संशोधनामुळे असे उपचार उपलब्ध झाले आहेत की, गर्भाशयातील गाठींना होणारा रक्तपुरवठा कमी केला तर त्यांचा आकार कमी होऊ शकतो. कारण रक्तपुरवठा कमी झाला तर पेशींची वाढही कमी होते. त्यानुसार काही नवीन औषधे उपलब्ध आहेत, ज्यामुळे गाठींचा आकार कमी करता येतो. मात्र, या औषधांनी गाठी पूर्णपणे नाहीशा होत नाहीत. त्या तशाच राहतात, फक्त त्यांच्या आकारात आणि प्रमाणात कमी-जास्त फरक पडतो. जर गाठींचा आकार सुमारे ३ ते ४ सेंटीमीटर असेल आणि त्यातून त्रास होत असेल, तर ऑपरेशन करून त्या काढाव्या लागतात. पण जर कोणताही त्रास नसेल, तर विशेष काळजी करण्याची गरज नसते. साधारणतः ४० वर्षांपर्यंत ऑपरेशन करण्याचा विचार केला जातो. विशेषतः त्रास होत असल्यास. मात्र, वय जास्त (उदा. ७०-८० वर्षे) असताना सोनोग्राफीमध्ये फायब्रॉईड आढळले आणि त्रास नसेल, तर काळजी करण्याचे कारण नसते. फायब्रॉईड्समध्ये कॅन्सर होण्याची शक्यता खूप कमी म्हणजे सुमारे १% इतकीच असते. त्याला सार्कोमा असे म्हणतात. तुलनेने, ओव्हरीमध्ये कॅन्सर होण्याची शक्यता जास्त (सुमारे ६०-७५%) असते. त्यामुळे फायब्रॉईड्सबाबत कॅन्सरचा धोका कमी मानला जातो.



### ऑपरेशननंतर या गाठी पुन्हा होतात का?

**डॉ. रश्मी फडणवीस-** ऑपरेशननंतर गाठी पुन्हा होतीलच असे नाही. पण काही वेळा असे होते की, ऑपरेशन करताना गाठी त्यांच्या कॅप्सूलपासून काढल्या जातात. जर त्यातील अगदी सूक्ष्म भाग (बीज) राहिला, तर त्यापासून पुन्हा गाठी विकसित होऊ शकतात. त्यामुळे त्या पुन्हा होण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. मात्र, हा धोका तुलनेने कमी असतो.

आजकाल सोनोग्राफीमुळे या गाठींचे लवकर निदान होऊ शकते. त्यामुळे उपचार वेळेत करता येतात. प्रसूतीच्या वेळी जर नॉर्मल डिलिव्हरी झाली, तर या गाठी लक्षात येत नाहीत. पण सी-सेक्शन करताना त्या आपोआप दिसून येतात. मात्र, त्यावेळी त्या काढल्या जात नाहीत. कारण खूप रक्तस्त्राव होण्याचा धोका असतो. त्यामुळे अशा गाठी साधारण १ ते २ महिन्यांनंतर काढल्या जातात. जर या गाठींमुळे गर्भधारणेत अडथळा येत असेल, तर त्या लवकर काढणे आवश्यक असते.

पण जर कोणताही त्रास नसेल, तर विशेष काळजी करण्याची गरज नसते. तरीही वेळोवेळी सोनोग्राफी करून त्यावर लक्ष ठेवणे महत्त्वाचे असते. या गाठींमध्ये वेळोवेळी काही बदल होऊ शकतात. कधी त्यात पाण्यासारखा द्रव तयार होतो, तर कधी रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे काही भाग नष्ट होतो. काही वेळा वेदनादायक बदलही होऊ शकतात. हे सर्व बदल ओळखण्यासाठी नियमित तपासणी गरजेची असते. गाठी काढायच्या की नाही, हे पूर्णपणे लक्षणांवर अवलंबून असते. जर खूप त्रास होत असेल, गर्भधारणेत अडथळा येत असेल किंवा मेनोपॉजनंतरही त्रास होत असेल, तर त्या काढणे आवश्यक असते. पण गाठी लहान असतील आणि कोणताही त्रास देत नसतील, तर त्या काढण्याची गरज नसते.

**या गाठींमुळे मासिक पाळीत त्रास होतो का?**

**डॉ. रश्मी फडणवीस-** हो, फायब्रॉईड्समुळे पिरियड्समध्ये विविध प्रकारचे त्रास होऊ शकतात. जर गाठ अशा ठिकाणी असेल की जिथे रक्तप्रवाहाला अडथळा निर्माण होतो, तर पोटात तीव्र वेदना जाणवू शकते. जर फायब्रॉईड सबम्यूकोसल प्रकारचा असेल, म्हणजे गर्भाशयाच्या आतील आवरणाशी संबंधित असेल, तर त्यामुळे जास्त प्रमाणात रक्तस्त्राव होतो. अशावेळी अचानक जास्त ब्लीडिंग झाल्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागतो आणि तपासणीत फायब्रॉईड असल्याचे लक्षात येते. काही वेळा फायब्रॉईड पेडंक्युलेटेड प्रकारचा असतो, म्हणजे तो देठासारख्या भागावर वाढत जातो. हा गर्भाशयाच्या बाहेर किंवा आत दोन्ही बाजूंनी वाढू शकतो. अशा परिस्थितीत काही वेळा संभोगानंतरही रक्तस्त्राव होऊ शकतो. फायब्रॉईडची जागा देखील त्रासावर परिणाम करते. जर तो गर्भाशयाच्या पुढील भागात असेल, तर मूत्राशयावर दाब येऊन लघवीचा त्रास होऊ शकतो. आणि जर तो मागील भागात असेल, तर रेक्टमवर दाब येऊन बद्धकोष्ठता होऊ शकते. मासिक पाळीच्या काळात हे त्रास अधिक जाणवू शकतात. काही वेळा चांगला रक्तपुरवठा असल्यास फायब्रॉईड्सचा आकारही वाढू शकतो, आणि त्यामुळे पोटदुखी अधिक तीव्र होऊ शकते.

**मग यासाठी आपण कोणते खाद्यपदार्थ खाल्ले पाहिजेत?**

**डॉ. रश्मी फडणवीस-** यासाठी सर्वप्रथम साखरेचे प्रमाण कमी करणे आवश्यक आहे. तसेच प्रक्रिया केलेले पदार्थ टाळावेत. मांसाहार, मैद्याचे पदार्थ आणि साखर यांचे सेवन कमी करणे गरजेचे आहे. हे पदार्थ टाळल्याने गाठींचा आकार काही प्रमाणात कमी होऊ शकतो. मात्र, आधीपासून असलेल्या गाठी पूर्णपणे नाहीशा होत नाहीत. त्यांच्या आकारात कमी-जास्त फरक पडतो. जीवनशैलीत बदल करणेही महत्त्वाचे आहे. नियमित योगाभ्यास केल्याने शरीरातील संतुलन सुधारते आणि गाठींची वाढ नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

**गाठींमुळे वजन वाढते किंवा शरीरात इतर बदल होतात का?**

**डॉ. रश्मी फडणवीस-** साधारणपणे गाठींमुळे थेट वजन वाढणे किंवा कमी होणे असे स्पष्ट बदल दिसत नाहीत. मात्र, गाठींचा आकार वाढल्यास पोटदुखी, अपचन किंवा पोटाशी संबंधित त्रास जाणवू शकतो. उपचारांमध्ये शस्त्रक्रिया हा एक पर्याय असला, तरी लगेच ऑपरेशन करणे आवश्यक नसते. आहारात बदल करणे, दररोज सुमारे ३ लीटर पाणी पिणे, नियमित व संतुलित आहार घेणे, प्रथिनांचे प्रमाण वाढवणे आणि तेलकट पदार्थ कमी करणे या गोष्टींमुळेही सुधारणा होऊ शकते.

गाठी म्हणजे पेशींची वाढ होऊन तयार झालेली संरचना. त्यामध्ये वेळोवेळी विविध प्रकारचे बदल होऊ शकतात. उदाहरणार्थ, पुटीजन्य बदल (cystic degeneration) मध्ये गाठीमध्ये पाण्यासारखा द्रव तयार होतो. रक्तजन्य बदल (red degeneration) मध्ये रक्तपुरवठ्याशी संबंधित बदल होतात. तसेच काही वेळा इतर द्रवरूप बदलही गाठींमध्ये दिसतात. हे सर्व बदल पेशींमध्ये होणाऱ्या प्रक्रियांमुळे घडतात.

### थायरॉईडमुळे असा त्रास होऊ शकतो का?

**डॉ. रश्मी फडणवीस-** थायरॉईडचा परिणाम मुख्यतः मासिक पाळीच्या चक्रावर होतो. मात्र, थायरॉईडमुळे गाठी होतातच असे नाही. हार्मोन्सचे असंतुलन झाल्यास गाठी निर्माण होऊ शकतात. गाठी या स्तनांमध्ये होणाऱ्या गाठींसारख्याच असतात, म्हणजे शरीरात कुठेही पेशींची अनियमित वाढ झाली तर गाठ तयार होऊ शकते. गर्भाशयात या गाठी वेगवेगळ्या ठिकाणी होऊ शकतात-स्नायूंमध्ये, आतील आवरणावर, बाहेरील आवरणावर किंवा गर्भाशयाच्या मुखाजवळ. अशा प्रकारे त्यांचे विविध प्रकार आढळतात.

# नाशिक कुंभमेळा रिंगरोड भूसंपादनावरून शेतकरी आक्रमक! पोलिसांवर आरोप

■ नाशिक

**नाशिकमध्ये** होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी रिंगरोड प्रकल्पासाठी होत असलेल्या भूसंपादनावरून नाशिक जिल्ह्यात वाद चिघळला आहे. मातोरी आणि मुंगसरा येथे मोजणीदरम्यान निर्माण झालेल्या तणावानंतर शेतकरी आक्रमक झाले आहेत. मोजणीवेळी शेतकरी आणि प्रशासनामध्ये जोरदार वाद झाला. यावेळी पोलिसांनी शेतकऱ्यांच्या घरात घुसून मारहाण केल्याचा गंभीर आरोप स्थानिकांनी केला आहे.

सिंहस्थ परिक्रमा मार्गासाठी ६६.१५ किमी लांबीचा रिंगरोड प्रकल्प प्रस्तावित आहे. हा रिंगरोड २५ गावांतून जाणार असून, सुमारे ३६५ हेक्टर जमीन संपादित करण्यात येत आहे. यापैकी १९ गावांनी भूसंपादनास संमती दिली असली तरी उर्वरित गावांचा विरोध कायम आहे. मातोरी आणि मुंगसरा परिसरातील ग्रामस्थांनी 'पेसा' अंतर्गत ग्रामपंचायतींचे ठराव न घेता प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोप केला आहे.

अनेकांची घरे प्रकल्पात जात असल्याने शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. प्रशासनाच्या विरोधात उद्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी जनआक्रोश आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# मुंबईतील केंद्र सरकारच्या जागेवरील झोपड्यांचा पुनर्विकास लटकला

■ मुंबई

**मुंबईसह** उपनगरात केंद्र सरकारच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्ट्यांचा एसआरए योजनेंतर्गत पुनर्विकास करण्यासाठी मंजुरी मिळावी असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्राकडे पाठविला आहे. मात्र केंद्र सरकारने आपली भूमिका गुलदस्त्यात ठेवल्यामुळे पुनर्विकास योजना कागदावरच राहण्याची दाट शक्यता आहे.

मुंबई विमानतळ प्राधिकरण रेल्वे संरक्षण दल, मिठागर, बीपीटी, आरसीएफ, कस्टम आणि आयआयटी या केंद्र सरकारच्या मालकीच्या जमिनीवर हजारो झोपडपट्ट्या उभ्या आहेत. येथील रहिवाशांना हक्कांच्या घरांसाठी पुनर्विकास योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून राज्य शासनाने केंद्राकडे येथील झोपडपट्ट्यांच्या नियोजन बद्ध विकासासाठी प्रस्ताव पाठविला आहे. परंतु केंद्राने हा प्रस्ताव अनेक वर्षे लालफितीत गुंडाळून ठेवल्यामुळे मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्याचे राज्य शासनाचे स्वप्न फक्त स्वप्नच म्हणून राहणार का? असे वाटू लागले आहे.

# चेन्नई विमानतळावर प्रवाशाची आपत्कालीन दरवाजातून उडी

■ चेन्नई

**चेन्नई** विमानतळावर आज सकाळी थरारक आणि धक्कादायक प्रकार झाला. शारजाहून आलेल्या एअर अरेबियाच्या विमानाने लँडिंग केल्यानंतर एका प्रवाशाने अचानक आपत्कालीन दरवाजा उघडून विमानातून उडी मारली. या घटनेमुळे विमानातील इतर प्रवाशांमध्ये भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. विमान धावपट्टीवरून हळूहळू पुढे सरकत असताना संबंधित प्रवाशाला अस्वस्थ वाटू लागले. काही क्षणातच त्याने इमर्जन्सी एक्झिटचा दरवाजा उघडला आणि खाली उडी मारली. मात्र ही घटना विमान पूर्णपणे थांबल्यानंतर लगेचच घडल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. घटनेनंतर विमानातील केबिन क्रू आणि विमानतळावरील सुरक्षा यंत्रणा सक्रिय झाली.

# सार्वजनिक जागेवर नमाजाचा अधिकार नाही

■ प्रयागराज

**सार्वजनिक** जमीन कोणत्याही व्यक्ती किंवा समूहाने धार्मिक कार्यांसाठी, नमाज अदा करण्यासाठी वापरता येणार नाही, असे निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

न्या. सरल श्रीवास्तव आणि न्या. गरिमा प्रसाद यांच्या खंडपीठाने संभल जिल्ह्यातील गुन्नौर तहसील अंतर्गत इकोना येथील रहिवासी आसिन यांनी दाखल केलेली याचिका फेटाळताना हे निरीक्षण नोंदवले. या याचिकेत नमाज अदा करण्यासाठी जमिनीच्या वापराबाबत दिलासा मागण्यात आला होता. न्यायालयाने स्पष्ट केले की, सार्वजनिक जमीन कोणत्याही एका पक्षाला

### कोर्टाने स्पष्ट केले



धार्मिक कारणांसाठी एकतर्फी वापरता येणार नाही. अशा मालमत्तेवर सर्व नागरिकांना समान अधिकार आहेत आणि तिचा एकट्याने वापर कायदेशीरदृष्ट्या मान्य नाही. मुनाझिर खान विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि इतर या प्रकरणासह पूर्वीच्या निकालांचा संदर्भ देताना न्यायालयाने नमूद केले की, खासगी जागेत प्रामाणिकपणे पार पाडल्या जाणाऱ्या धार्मिक प्रथा संरक्षित असल्या आणि त्यात मनमानी हस्तक्षेप करता येत नसला, तरी याचा अर्थ नियमित किंवा संघटित सामूहिक धार्मिक उपक्रमांसाठी पूर्ण मोकळीक दिली असा होत नाही.

# कल्याणमध्ये वाहतूक पोलिसावर हल्ला! दोन जण ताब्यात

■ कल्याण

**कल्याण** पूर्वेतील नांदिवली तर्फ परिसरात वाहतूक सुरळीत करत असताना एका वाहतूक पोलिसावर दोन तरुणांनी हल्ला केला. या घटनेत पोलीस कर्मचाऱ्याला रक्त येईपर्यंत मारहाण करण्यात आली असून, परिसरात खळबळ उडाली आहे.

वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी रस्त्यावर कार्यरत असताना संबंधित पोलिसांनी एका कारमधील दोन व्यक्तींना वाहन बाजूला घेण्यास सांगितले. मात्र, याचा राग आल्याने त्या दोघांनी पोलिसाला शिवीगाळ करत ठोशाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यात वाहतूक पोलीस देविदास गोपाळ वाघेरे जखमी झाले आहेत. ते कोळसेवाडी वाहतूक शाखेत कार्यरत असून, त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. या प्रकरणी वाघेरे यांच्या तक्रारीवरून कोळसेवाडी पोलीस ठाण्यात दोघांविरोधात शासकीय कामात अडथळा आणणे आणि मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.

# ३४ वर्षांनंतर अमेरिकेची स्पिरिट एअरलाईन्स बंद! सर्व उड्डाणे रद्द

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेतील** स्वस्त विमान सेवा देणारी स्पिरिट एअरलाईन्सने तब्बल ३४ वर्षांच्या सेवेनंतर आपले कामकाज तत्काळ बंद




करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे कंपनीची सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली असून, प्रवाशांसाठी ग्राहक सेवा देखील बंद करण्यात आली आहे.

स्वस्त तिकिटे आणि आकर्षक पिवळ्या विमानांसाठी ओळखली जाणारी ही विमान कंपनी दररोज शेकडो उड्डाणे चालवत होती. कंपनीत सुमारे १७,००० कर्मचारी कार्यरत होते. अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे या कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर गंडांतर येण्याची शक्यता आहे. प्रवाशांना त्यांच्या तिकिटांचे पैसे परत मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, पर्यायी उड्डाणांची व्यवस्था करण्यासाठी कंपनीकडून कोणतीही मदत दिली जाणार नाही. लास वेगास, फोर्ट लॉडरडेल आणि ओरलँडो या शहरांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फटका बसणार आहे. या मार्गांवर कंपनीचा मोठा विस्तार होता. सरकारी मदतीचा प्रस्ताव फेटाळला गेल्यानंतर हा निर्णय अपेक्षित होता. पण तो प्रत्यक्ष घेतला गेल्याने कर्मचारी तणावात आले आहेत.

# राघव चढ्ढा पंजाब विषयावर राष्ट्रपतींची उद्या भेट घेणार

■ नवी दिल्ली



**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी राज्यसभा खासदार राघव चढ्ढा यांना भेटीसाठी वेळ दिला आहे. मंगळवारी सकाळी चढ्ढा राष्ट्रपतींची भेट घेणार आहेत. पंजाबमध्ये सरकारी यंत्रणेचा गैरवापर होत असल्याची तक्रार करण्यासाठी त्यांनी राष्ट्रपतींकडे भेटीची वेळ मागितली असल्याची माहिती हाती आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवट लावण्याचा भाजपाचा प्रयत्न असल्याचा आरोप केला जात आहे.

राघव चढ्ढा यांचे म्हणणे आहे की, पंजाबमधील सरकारी यंत्रणेचा वापर राजकीय सूडभावनेतून केला जात असून अलीकडेच आम आदमी पार्टी सोडून भारतीय जनता पार्टीमध्ये सहभागी झालेल्या खासदारांना लक्ष्य केले जात आहे. राष्ट्रपतींनी राघव चढ्ढा आणि आणखी तीन खासदारांना ५ मे रोजी सकाळी १०.४० वाजता भेटीसाठी वेळ दिला आहे.

# नागपुरात उष्माघाताने तिघांचा मृत्यू लातूरमध्ये बैलजोडी दगावली

■ नागपूर

**नागपूर** शहरात उष्माघातामुळे तिघांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तर लातूरमध्ये उष्माघाताने बैलजोडीचा मृत्यू झाला आहे.

यशोधरानगर आणि गणेशपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन वृद्ध पुरुष बेशुद्धावस्थेत आढळून आले. त्यांचे वय अनुक्रमे ५८, ६० आणि ६५ वर्षे असल्याचे सांगितले जात आहे. संबंधितांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, तिघांचाही मृत्यू उष्माघातामुळे झाला असावा, असा अंदाज आहे. दरम्यान, नागपुरात उष्णतेची लाट अधिक तीव्र होत असून, गेल्या काही दिवसांत सुमारे १५ बेघर व्यक्तींच्या मृत्यूची नोंद झाली आहे.

प्रशासनाने नागरिकांना दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचे, पुरेसे पाणी पिण्याचे आणि उष्णतेपासून बचाव करण्याचे आवाहन केले आहे. उष्म्याचा फटका आता जनावरांनाही बसू लागला आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील सावरी गावात शेतात बांधलेल्या बैलजोडीचा उष्माघाताने मृत्यू झाला. शेतकरी मदन भंडारे यांनी सकाळ-सायंकाळ शेतीची मशागत केल्यानंतर बैलांना सावलीत बांधले होते. मात्र रात्री तपासणीसाठी गेल्यावर एक बैल मृतावस्थेत, तर दुसरा तडफडत असल्याचे दिसले. भंडारे यांनी तत्काळ पशुवैद्यकीय डॉक्टरांना पाचारण केले. मात्र डॉक्टर येण्यापूर्वीच दुसऱ्या बैलानेही प्राण सोडला.

तहसील प्रशासनाच्या वतीने पंचनामा करण्यात आला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, अतिउष्णतेमुळे शरीरातील पाण्याची कमतरता आणि उष्माघाताने बैलांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.